सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २७० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका ठरलेल्या वेळेनुसार होणार, स्थगिती नाही : सुप्रीम कोर्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नवी दिल्ली**

नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुकांबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. निवडणुकीतील ५० टक्के आरक्षणाबाबत आज सुप्रीम कोर्टात सुनावणी झाली. यावेळी सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. नगरपालिका आणि नगरपंचायत निवडणुका ठरलेल्या वेळेनुसार होणार आहेत. सुप्रीम कार्टात २१ जानेवारी रोजी पुढील सुनावणी होणार आहे.



हे प्रकरण आता जानेवारीच्या दुसऱ्या आठवड्यात प्रथम तीन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, नगरपालिका आणि नगर पंचायती यांच्या निवडणुका जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार होऊ शकतात. मात्र, ज्या ४० नगरपालिका आणि १७ नगर पंचायतींमध्ये आरक्षण ५०% पेक्षा जास्त आहे, त्यांच्या निवडणूक निकालांना या प्रकरणाच्या अंतिम निर्णयाचे अधीन राहावे लागेल, असंही कोर्टाने म्हटले आहे.

इतर स्थानिक स्वराज्य संस्थांसंदर्भात राज्य सरकार आणि राज्य निवडणूक आयोग यांना निवडणूक प्रक्रिया सुरू करण्यास मुभा असमार आहे. मात्र, या संस्थांमध्ये आरक्षण ५०% पेक्षा जास्त ठेवले जाऊ नये. ही अटही अंतिम निकालावर अधीन राहणार आहे.

मंगळवारी न्यायालयाने ५० टक्क्यांच्या मर्यादेत आरक्षण द्या आणि नंतरच निवडणूक घ्या, असे आदेश दिले तर जिल्हा परिषद आणि महापालिका निवडणूक किमान महिनाभर तरी पुढे ढकलली जाईल, अशी शक्यता होती. पण, आता आजच्या सुनावणीमध्ये निवडणुका वेळेत होणार असल्याचे निर्देश दिले आहेत.

## भिजलेला माणूस कुणाला घाबरत नाही : मला संपवण्याचा प्रयत्न

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

मालवण नगरपरिषद निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गट आणि भाजप यांच्यातील सत्तासंघर्ष दिवसेंदिवस तीव्र होताना दिसत आहे. नुकत्याच घडलेल्या एका घटनेत शिवसेना शिंदे गटाचे आमदार नीलेश राणे यांनी भाजप पदाधिकारी विजय किनवडेकर यांच्या राहत्या घरावर धाड घालत मोठा गोंधळ उडवला. या कारवाईत कथितपणे बेहिशोबी २५ लाख रुपये आढळून आल्याचा दावा राणेंनी केला आहे. पैशांच्या राजकारणाचा आरोप करत त्यांनी भाजप नेते रवींद्र चव्हाण यांच्यावर थेट जबाबदार असल्याची तिखट टीका केली. या कारवाईनंतर राणे विरुद्ध भाजप असा तीव्र संघर्ष पेटला असून मालवणातील निवडणूक वातावरण अधिक तापले आहे.




ही कारवाई करताना राणे स्वतः घरात शिरले आणि पिशवीत ठेवलेली रोकड दाखवली. निवडणूक आयोगाने आणि पोलिसांनी हे पैसे जप्त केले म्हणजे गुन्हा घडलेला आहे, असे सांगत राणे यांनी तपासात विलंब केला जात असल्याचा आरोप केला. त्यांनी स्पष्ट शब्दांत विचारले की, पैसे कुठून आले? कोणी दिले? अजूनपर्यंत आरोपीला नोटीस का नाही? न्याय आणि प्रशासनाच्या यंत्रणा दबावाखाली काम करत असल्याचा संकेत देत राणे म्हणाले की, सत्य लपवण्याचा प्रयत्न सुरू आहे. तसेच भाजप उमेदवारांविरुद्ध दाखल प्रकरणांवरही योग्य कारवाई होत नसल्याने न्यायव्यवस्थेवरचा विश्वास डळमळतोय, असे मत त्यांनी मांडले.

## 'दितवाह' चक्रीवादळ भारताच्या दिशेने; श्रीलंकेत ४६ जणांचा बळी, 'या' राज्यांमध्ये सतर्कतेचा इशारा!

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नवी दिल्ली**

शेजारील देश श्रीलंकेमध्ये मोठी हानी केल्यानंतर 'दितवाह' नावाचे भयानक चक्रीवादळ आता भारताच्या किनाऱ्याकडे वेगाने सरकत आहे. या पार्श्वभूमीवर भारतीय हवामान विभागाने तामिळनाडू, आंध्र प्रदेश, केरळ आणि पुद्दुचेरीसह काही राज्यांसाठी 'प्री-सायक्लोन' अलर्ट जारी केला आहे.

श्रीलंकेत 'दितवाह'ने मोठे नुकसान केले आहे. या वादळामुळे आतापर्यंत ४६ लोकांचा मृत्यू झाला असून, २३ जण बेपत्ता आहेत. गेल्या २४ तासांत ३०० मिमी पेक्षा जास्त मुसळधार पाऊस झाला आहे. ज्यामुळे अनेक ठिकाणी भूस्खलनाच्या, पुराच्या घटना घडल्या आहेत. ४३,९९१ लोकांना सुरक्षितस्थळी हलवण्यात आले आहे. श्रीलंकेतील शाळा बंद करण्यात आल्या, रेल्वे सेवा थांबवण्यात आली आहे. तर कोलंबो स्टॉक एक्स्चेंजमधील व्यवहारही लवकर थांबवावे लागले आहेत. श्रीलंकेतील परिस्थिती बिघडल्यास, त्यांची विमाने दक्षिण




भारतातील त्रिवेंद्रम किंवा कोचीन विमानतळांवर वळवली जाऊ शकतात, असेही स्थानिक माध्यमांनी म्हटले आहे.

बंगालच्या उपसागरात तयार झालेले हे चक्रीवादळ आता श्रीलंकेच्या किनाऱ्यावरून हळूहळू भारताच्या दिशेने सरकत आहे. हवामान विभागाने पुढील १२ तासांत हे वादळ आणखी तीव्र होण्याची शक्यता वर्तवली आहे. चक्रीवादळाचा धोका प्रामुख्याने उत्तर तामिळनाडू, पुद्दुचेरी, दक्षिण आंध्र प्रदेश, तेलंगणा आणि केरळच्या किनारपट्टीवर आहे. या भागांमध्ये ३० नोव्हेंबरपर्यंत हवामान अत्यंत खराब राहण्याची शक्यता आहे.

## महाराष्ट्रातील प्रसिद्ध सुपरफास्ट मिर्झा एक्सप्रेस थांबली

### डॉ. मिर्झा रफी अहमद यांचे निधन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती**

महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध कवी, हास्यसम्राट, 'मिर्झा एक्सप्रेस 'फेम डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे शुक्रवार, २८ नोव्हेंबर शुक्रवारला सकाळी ६:३० वाजता दीर्घ आजाराने निधन झाले.ते ६८ वर्षांचे होते.

यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्यातील धनज - माणिकवाडा हे त्यांचे मूळ गाव आहे. सध्या अमरावती येथील परतवाडा रोडवरील नवसारी परिसरात मिर्झा एक्सप्रेस या घरात त्यांचे वास्तव्य होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी फातेमा मिर्झा, अभियंता मुलगा रमीज, मेंहजबी व हुमा या दोन सुविद्य कन्या आहेत. त्यांच्यावर अमरावती येथील ईदगाह कब्रस्तानात दुपारी दोन नंतर अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष राहिलेले डॉ.मिर्झा रफी



अहमद बेग आपल्या खुमासदार सादरीकरणासाठी संपूर्ण महाराष्ट्रात प्रसिद्ध होते. त्यांचे एकूण २० काव्यसंग्रह असून महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात त्यांनी आपल्या मिर्झा एक्सप्रेस या काव्य मैफिलीचे ६ हजारावर सादरीकरण केले आहे.

गेल्या काही दिवसापासून मूत्रपिंडाच्या आजाराने ते त्रस्त होते. त्यांच्यावर अमरावती येथे उपचार सुरू होते. वयाच्या ११ वर्षापासून त्यांनी कविता लेखनाला सुरुवात केली होती. १७ सप्टेंबर १९५७ चा त्यांचा जन्म. १९७० पासून त्यांनी मंचावर कविता सादर करायला सुरुवात केली. पुढील ५० वर्ष विदर्भ, मराठवाड्यातील कवी संमेलनाचे ते केंद्रबिंदू ठरले. वृत्तपत्रातील विविध स्तंभातून लेखनही त्यांनी केले. त्यांचा मिर्झाजी कहीन हा त्यांचा स्तंभ तुफान लोकप्रिय ठरला होता. त्यांचे २० काव्यसंग्रह असून मिर्झा एक्सप्रेस या नावाने अफलातून किस्से आणि कवितेचा कार्यक्रम प्रसिद्ध होता. शेती, माती, कृषी, शेतकऱ्यांच्या समस्या, ग्रामीण भागातील समस्या, आणि सामाजिक समस्यांवर व राजकीय विरोधाभासावर नर्म विनोदी शैलीमध्ये लिखाण करणे ही त्यांची खास हातोटी होती.

विदर्भातील ख्यातनाम संत फकीरजी महाराज या मंदिर ट्रस्टचे ते ट्रस्टी होते. त्यांचे वडील मिर्झा रज्जाक बेग उर्फ भाईजी हे यवतमाळ जिल्ह्यातील प्रभावी राजकीय सामाजिक व्यक्तिमत्व होते. विदर्भातील नागपूर येथील सुप्रसिद्ध ज्येष्ठ विधीज्ञ फिरदोस मिर्झा हे त्यांचे चुलत बंधू आहेत. मराठी, वऱ्हाडी भाषेवर त्यांचे प्रचंड प्रेम होते. त्यांच्या कार्यक्रमांनी वऱ्हाडी भाषेची महती देशभर झाली. राजधानी दिल्लीपासून तर महाराष्ट्राच्या राजधानीत मुंबईपर्यंत त्यांचे कार्यक्रम सतत सुरू असायचे. मोठा माणूस, सातवा महिना, उठ आता गणपत, जांगडबुत्ता अशा कितीतरी कविता त्यांच्या लोकप्रिय झाल्या.जांगडबुत्ता या शब्दाचे ते जनक आहेत.

**मुसलमान असूनही येते मला मराठी**

ठेकूनका माई पाठ याच्यासाठी, जो जिथे जन्मला तेच त्याची भाषा, पऱ्हाटीकून बोंडाचीच करानं आशा. अशा शब्दात त्यांचे काव्य लेखन असायचे.

## माजी मुख्यमंत्र्यांची मांडी खूप छोटीये

### कोकाटे म्हणाले, शिंदेंनी फक्त कमिटमेंट पूर्ण करण्यासारखीच आश्वासनं द्यावीत

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८नंदुरबार**

नंदुरबार जिल्हा परिषद निवडणुकीच्या रणधुमाळीत महायुतीमधील घटक पक्षांमध्येच राजकीय शाब्दिक युद्ध रंगले आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केलेल्या एका घोषणेवरून पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांनी त्यांना उपरोधात्मक टोला लगावला आहे. तळोदा नगरपरिषद निवडणुकीच्या प्रचारासाठी एकाच दिवशी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या सभा झाल्या. दुपारी झालेल्या सभेत एकनाथ शिंदे यांनी तळोदा शहराच्या विकासासाठी नगरपरिषद दत्तक घेण्याची महत्त्वपूर्ण घोषणा केली. तसेच, लाडकी बहीण योजना कोणीही बंद पाडू शकणार नाही



आणि बारगळ जहागीरीचा प्रश्न सोडवून तळोद्याला मुक्त करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या याच घोषणेचा संदर्भ देत माणिकराव कोकाटे यांनी तळोद्यातील सभेत त्यांची खिल्ली उडवली.

नगरपंचायत निवडणुकीसाठी सत्ताधाऱ्यांकडून विविध आश्वासन दिलं जात असतानाच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रचारादरम्यान काही ठिकाणी नगरपरिषद दत्तक घेण्याची घोषणा केली आहे. नंदुरबारमध्ये बोलताना त्यांनी तळोदा नगरपरिषद दत्तक घेण्याचे आश्वासन दिलं. त्यानंतर आता पालकमंत्री कोकाटे यांनी यावेळी एकनाथ शिंदे यांच्या राजकीय आश्वासनांवर शंका उपस्थित केली. मागील दहा वर्षांपासून नगरविकास खाते एकनाथ शिंदे यांच्याकडेच होते. असे असतानाही तळोदा नगरपरिषदेच्या विकासासाठी त्यांनी पुरेसा निधी दिला नसल्याचे कोकाटे म्हणाले.

अजित पवार यांनी एकदा शब्द दिला की ते पूर्ण करतात. आम्ही राजकारण कमी आणि समाजकारण जास्त करत असतो. जो काही निधी मिळवायचा असतो तो अजित पवार यांच्या माध्यमातून मिळवतो. लाडकी बहीण योजना ही सरकारची आहे. ती कुठल्याही पक्षाची योजना नाही. त्यामुळे कुणी हरलं किंवा जिंकलं तरी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही, असंही आश्वासन कोकाटे यांनी दिले.

## धाराशिव पालिकेच्या तीन प्रभागातील निवडणुका स्थगित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८धाराशिव**

धाराशिव नगरपरिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीत गुरुवारी छाननीच्या वेळी अर्ज वैध-अवैध ठरविल्याच्या कारणावरून तीन प्रभागातील उमेदवार न्यायालयात गेले होते. त्यांच्या प्रकरणाची सुनावणी विहित वेळेत पूर्ण होऊ न शकल्याने राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी या तिन्ही प्रभागातील निवडणुका स्थगित करण्याच्या सूचना पालिकेच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

धाराशिव नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी व ४१ नगरसेवक पदांसाठी निवडणुकीची प्रक्रिया सुरू आहे. छाननीदरम्यान, शहरातील प्रभाग क्रमांक २ अ, ७ ब व १४ ब या प्रभागातील अर्जाच्या वैध-अवैधतेवरून वादंग झाले. यामुळे संबंधित आक्षेपकर्त्यांनी व उमेदवारांनी जिल्हा न्यायालयात धाव घेतली होती. त्यांच्या प्रकरणावर चिन्ह वाटपापूर्वी निर्णय अपेक्षित होते. मात्र, विहित वेळेत न्यायालयीन आदेश प्राप्त न झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी ओंकार देशमुख यांनी २६ नोव्हेंबर रोजी राज्य निवडणूक आयोगाकडे तसेच जिल्हाधिकाऱ्यांकडेही मार्गदर्शन मागवले. त्यास आयोगाने संबंधित प्रभागातील निवडणुका पुढील आदेशापर्यंत स्थगित करण्याच्या सूचना केल्याने जिल्हाधिकाऱ्यांनी गुरुवारी पत्राद्वारे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना या निवडणुका स्थगित करण्याचे निर्देश दिले आहेत.

## भास्कर जाधव यांना मातोश्रीवरुन समज चिपळूणमध्ये शिवसेना ठाकरे गटात तणावाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी सुरू असताना रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूणमध्ये शिवसेना ठाकरे गटात मोठी खळबळ उडाली आहे. ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनी पक्षाच्या अधिकृत उमेदवारांऐवजी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे उमेदवार रमेश कदम यांच्या प्रचारात उडी घेतल्याने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

चिपळूण नगरपालिकेच्या निवडणुकीत ठाकरे गटाने स्वतःचे उमेदवार उभे केले आहेत. नगराध्यक्ष पदासह २४ नगरसेवक पदांवर पक्षाचे




उमेदवार रिंगणात असतानाही जाधव यांनी पत्रकार परिषद घेत राष्ट्रवादीच्या रमेश कदम यांना पाठिंबा जाहीर केला. यावेळी त्यांनी सांगितले होते की, स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या विनंतीवरून मी निवडणूक तिढा सोडवण्यासाठी पुढाकार घेतला होता. मी शब्द दिला असल्याने आता परिणामांची चिंता न करता रमेश कदम यांचा प्रचार करणार आहे. या वक्तव्यांमुळे ठाकरे गटात प्रचंड नाराजी व्यक्त होत असल्याचे समजते.

चिपळूणमध्ये शिवसेनेचे जिल्हाप्रमुख व खासदार विनायक राऊत आणि भास्कर जाधव यांच्यातील विसंवाद मागील काही महिन्यांपासून दिसून येत आहे. या अंतर्गत कलहाचा विस्फोट आता निवडणूक तोंडावर झाला आहे. विनायक राऊत यांच्या दौऱ्यानंतरही भास्कर जाधव यांची नाराजी कायम असल्याचे चित्र आहे. पक्षातील या गंभीर परिस्थितीची माहिती थेट मातोश्रीपर्यंत पोहोचली आहे.

## मुंबईसह ६ महापालिकेच्या निवडणुका उद्धव ठाकरे अन् राज ठाकरे एकत्र लढणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

माजी मुख्यमंत्री, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल (२७ नोव्हेंबर) मनसेप्रमुख राज ठाकरे यांची शिवतीर्थ या निवासस्थानी भेट घेतली. यावेळी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यात मुंबई महानगरपालिकेसह विविध मुद्द्यांवर चर्चा झाली.

राज ठाकरेंची मनसे आणि उद्धव ठाकरेंचा शिवसेना ठाकरे गट राज्यातील सहा महापालिकेच्या निवडणुका



एकत्र लढणार आहेत. मुंबई महापालिकेसह कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, ठाणे, नाशिक, पुणे महापालिकेत ठाकरेंची शिवसेना आणि मनसेची युती होणार आहे. ठाणे महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने ठाकरेंच्या शिवसेनेकडून राजन विचारे, तर मनसेकडून अविनाश जाधव यांना जागा वाटपाची चर्चा करण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. तसेच कल्याण-डोंबिवली महापालिकेमध्ये मनसेचे माजी आमदार राजू पाटील, तर ठाकरेंच्या शिवसेनेकडून आमदार वरूण सरदेसाई यांच्याकडे जागा वाटपाच्या चर्चेची जबाबदारी असणार आहे.मराठीबहुल भागातील अधिकाधिक प्रभाग मिळावेत यासाठी मनसे आग्रही असल्याची सुत्रांची माहिती आहे. शिवसेना ठाकरेंकडे विद्यमान नगरसेवक असलेल्या २० ते २५ जागांचीही मनसेकडून मागणी करण्यात आली आहे. तसंच ठाकरेंकडून शिंदे गटात गेलेल्या काही नगरसेवकांच्या जागांसाठीही मनसे आग्रही असल्याची माहिती समोर येत आहे. शिवसेना ठाकरे गटाची ताकद असलेल्याच अनेक जागा मनसे मागत असल्याने ठाकरे गटाची गोची झाली आहे.

**ठाकरे बंधूंची इथली युती पक्की**

बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका

## राज्य प्रशासनात मोठा बदल; महाराष्ट्राला नवे मुख्य सचिव, राजेश अग्रवाल यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२८मुंबई**

महाराष्ट्राच्या प्रशासकीय नेतृत्वात मोठा बदल होत असून वरिष्ठ आयएएस अधिकारी राजेश अग्रवाल यांची राज्याच्या नव्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात येत आहे. केंद्र सरकारने महाराष्ट्राच्या मागणीनुसार त्यांना केंद्रातील कामकाजातून राज्याकडे परत पाठवले असून आता ते राज्य प्रशासनातील सर्वात वरिष्ठ अधिकारी म्हणून पदभार स्वीकारतील. सध्याचे मुख्य सचिव राजेश कुमार मीणा यांची मुदत ३० नोव्हेंबरला संपत आहे आणि त्यानंतर अग्रवाल ही जबाबदारी सांभाळतील अशी अधिकृत माहिती समोर आली आहे.



राजेश अग्रवाल हे १९८९ च्या तुकडीतील आयएएस अधिकारी असून तंत्रज्ञान क्षेत्रातील त्यांचे विशेष कौशल्य ओळखले जाते. आयआयटी दिल्ली येथून संगणक अभियांत्रिकीतील बी.टेक. पदवी मिळविल्यानंतर ते प्रशासनात दाखल झाले. राज्यात त्यांनी अकोला व जळगावचे जिल्हाधिकारी, तसेच मुंबई महापालिकेत उपआयुक्त म्हणून काम पाहिले आहे. राज्याच्या अर्थ व आयटी विभागात त्यांनी महत्त्वपूर्ण सुधारणा राबवल्या. याच अनुभवाच्या जोरावर केंद्रातही त्यांनी अनेक महत्त्वाच्या राष्ट्रीय योजनांमध्ये योगदान दिले आहे.

केंद्रात तैनात असताना अग्रवाल यांनी आधार, जनधन योजना, डिजिलॉकर, सामाजिक न्याय विषयक डिजिटल उपक्रम अशा प्रकल्पांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावली.

## संपादकीय ......

# ठप्प पुलाने ठप्प शहर : अमरावतीच्या प्रशासनिक सुस्तीवर मोठा सवाल’

अमरावती शहराच्या वाहतुकीचे कणा असलेला राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन उड्डाणपूल बंद होऊन आज चार महिने उलटले आहेत. पण या चार महिन्यांत शहराची समस्या सुटली नाहीच, उलट परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. शहर काँग्रेसने जिल्हाधिकार्यांकडे केलेले निवेदन ही केवळ पक्षीय मागणी नाही, तर संपूर्ण शहराच्या वेदनेला आवाज देणारी हाक आहे. कारण हा पुल बंद असणे म्हणजे फक्त एक मार्ग बंद पडणे नव्हे-तर शहराच्या दैनंदिन जीवनातील प्रत्येक श्वासावर परिणाम करणारे संकट निर्माण होणे आहे.

राजकमल ते स्टेशन हा मार्ग अमरावतीचा शाब्दिक आणि प्रतीकात्मक लाइफलाइन आहे. शहराची पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण जोडणारी ही महत्त्वपूर्ण वाहतूकवाहिनी शहरातील व्यापारी, शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्था, रुग्णालये, रेल्वे स्टेशन, बाजारपेठा यांना थेट जोडते. त्यामुळे हा पूल बंद झाल्याने शहराच्या प्रत्येक भागात वाहतूक विस्कळीत झाली आहे. जयस्तंभ चौक, इर्विन चौक, सरोज चौक, चित्रा चौक येथे रोजच्या रोज तासन्तास ट्रॅफिक जाम होणे आता सामान्य झाले आहे. नागरिकांना घरापासून कामाच्या ठिकाणी पोहोचायला लागणारा वेळ दुप्पट-तिप्पट झाला आहे.

१५ मिनिटांचा प्रवास १ ते १.५ तासांवर पोहोचणे, ही परिस्थिती अमरावतीकरांसाठी आता दिनचर्या झाली आहे. लहान मुलांना शाळेत नेणारे पालक या विलंबामुळे त्रस्त झाले आहेत. विद्यार्थी स्वतःच ‘लेट’ होण्याचे कारण उड्डाणपूल नसून, प्रशासनाची बेफिकिरी आहे, असे म्हणू लागले आहेत. शासकीय व खासगी नोकरदारांना हीच कथा रोजच्या रोज अनुभवावी लागत आहे. दिवसभर वाहतुकीत अडकून त्यांच्यावर मानसिक ताण तर वाढतोच, पण कार्यालयीन कामावरही परिणाम होतो.याहून अधिक चिंतेची गोष्ट म्हणजे पुलाच्या परिसरातील व्यापाऱ्यांचा व्यापार ठप्प झाला आहे. ग्राहकांचे पाय थांबले, मालाच्या वाहतुकीत विलंब, दुकानांमधील गर्दी शून्यावर-यामुळे आर्थिक घड्याळ उलटे फिरू लागले आहे. दैनंदिन व्यापारी व्यवहार ठप्प झाल्यामुळे शहरातील छोटे व्यवसाय, पेढीतले दुकानदार, हॉटेल व्यवसाय, वाहतूकदार आणि सेवा क्षेत्रातील कामगार यांची रोजीरोटी धोक्यात आली आहे.

पण या सर्व अडचणींपेक्षा मोठी अडचण आहे ती प्रशासनातील समन्वयाचा पूर्ण अभाव. शहर काँग्रेसने नेमके हेच निर्दशनास आणले आहे की सार्वजनिक बांधकाम विभाग (झथऊ), रेल्वे विभाग, वाहतूक शाखा आणि महापालिका हे चारही विभाग एकत्र येऊन एकही संयुक्त बैठक घेऊ शकलेले नाहीत. विचारणा केली असता प्रत्येक विभाग जबाबदारी दुसऱ्यावर ढकलतो. नियोजन शून्य, दिशादर्शन शून्य, आणि नागरिकांना माहिती देण्याची तयारी नाही.

पर्यायी रस्ते कुठे?

वळवलेल्या वाहतुकीसाठी योग्य चिन्हे कुठे?

ट्रॅफिक पोलिसांची व्यवस्था कुठे?

अनावश्यक बॅरिगेट्स हटविण्याचा निर्णय कुठे?

यापैकी एकही गोष्ट व्यवस्थितपणे केली गेली नाही. शहराची वाहतूक कशी सुटणार हे अद्याप अनुत्तरित आहे. शहरातील मोठ्या चौकात रस्ते अरुंद करण्याइतपत बॅरिगेट्स रचलेले आहेत, पण त्यामागे कोणतेही तर्कसुसंगत कारण नाही. नागरिकांना सुरक्षित, सोयीस्कर पर्यायी मार्ग मिळण्याऐवजी गोंधळ, रांगा आणि अनिश्चितता मिळते आहे.

**महत्त्वाचा प्रश्न मात्र पुलाच्या भवितव्याचा आहे.**

**दुरुस्ती कधी सुरू होणार?**

**तोडकामाची तारीख काय?**

**पुनर्निर्माणाचा आराखडा काय?**

**पूर्ण प्रकल्पाची टाइमलाइन काय?**

रेल्वे, पीडब्ल्यूडी आणि महापालिकेची स्पष्ट व अधिकृत भूमिका अद्याप जाहीर नाही. फक्त ‘नोटिंग’, ‘प्रस्ताव’, ‘तांत्रिक तपासणी’ अशा शब्दांनी नागरिकांची दिशाभूल होत आहे.

देशातील मुंबई, नागपूर, पुणे यांसारख्या शहरांत पुलातील समस्या निर्दशनास आल्या की तातडीने तपासणी होते आणि तीन महिन्यांच्या आत काम सुरू होते. परंतु अमरावतीत चार महिन्यांत एक वीटही पाडलेली नाही, एक खांबही हललेला नाही. याला काय म्हणायचे? ही केवळ दिरंगाई आहे का? की शहराच्या समस्यांकडे दुर्लक्ष करण्याचा उद्योगप्रवृत्तीचा आजार?

या सर्व परिस्थितीवरून स्पष्ट होते की जिल्हाधिकारी यांनी स्वतः पुढाकार घेणे आवश्यक आहे. विभागांमध्ये समन्वय नसेल तर शीर्षस्थ पातळीवरून तो निर्माण करणे ही त्यांची जबाबदारी आहे. शहर काँग्रेसची मागणी योग्यच आहे की जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने संयुक्त बैठक बोलवावी, पर्यायी वाहतूक आराखडा जाहीर करावा आणि दुरुस्ती/पुनर्निर्माणाच्या कामाची निश्चित टाइमलाइन शहरासमोर ठेवावी.

अमरावतीला विकास हवा, आधुनिक पायाभूत सुविधा हव्यात, पण त्यासाठी प्रशासनिक तत्परता आणि जबाबदार वागणूक आवश्यक आहे. आज नागरिकांच्या हालअपेष्टा पाहता प्रशासनाला एकच संदेश द्यायचा आहे -

उड्डाणपूल थांबला तरी चालेल, पण शहर थांबू देऊ नका!

# कपाशीवरील लाल्या हा काही रोग नाही... मग लाल्या म्हणजे नेमकं काय?

**दि.२८विदर्भ प्रजासत्ताक**

कापसाची लागवड वाढली तरी उत्पादनावर लाल्याचे संकट कायम आहे. थंडी, अन्नद्रव्यांची कमतरता आणि हवामानातील उलथापालथ यामुळे कपाशीची झाडे अचानक कमकुवत होतात आणि पाने लाल होऊन गळू लागतात. बहुतांश शेतकरी याला रोग मानतात, पण मुळात ही पोषणातील कमतरतेची गंभीर चेतावणी असते. अतिपाऊस, ढगाळ वातावरण, मध्येच पाण्याचा ताण, थंडी, मॅग्नेशियम व बोरोनची कमतरता यामुळे उत्पादन घटते. योग्य अन्नद्रव्य व्यवस्थापन, वेळेवर फवारणी आणि मातीचे तापमान सांभाळणे या उपायांनीच कपाशीचे पीक व कापसाचे उत्पादन सुरक्षित ठेवता येते.




या वर्षी राज्यात ३८ लाख ५२ लाख ५१७ हेक्टर, तर विदर्भात १६ लाख ८६ हजार ४८६ हेक्टर व मराठवाड्यात १२ लाख ५८ हजार ७३ हेक्टरमध्ये कापसाची पेरणी करण्यात आली आहे. कपासाचा पहिला वेचा होतो न होतो तोच कपाशीवर लाल्या जायला सुरुवात झाली.

परभणी, नांदेड, अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर जिल्ह्यांतील काही शेतकऱ्यांनी पहिल्या वेचाचा एकरी तीन क्विंटल कापूस घरी आणला आणि लाल्यामुळे कपाशीची झाडे खराब झाल्याने ती काढून त्या जागेवर हरभऱ्याची पेरणी केली आहे. ही समस्या मागील काही वर्षांपासून सातत्याने उद्भवत आली तरी त्यावर कोणत्याच कायमस्वरुपी उपाययोजना केली जात नाही. बहुतांश शेतकरी लाल्याला रोग समजतात. पण, हा रोग नसून, ती अन्नद्रव्याच्या कमतरतेमुळे झाडांमध्ये निर्माण झालेली विकृती आहे. कपाशीच्या झाडांच्या निकोप वाढीसाठी नत्र, स्फुरद व पालाश या मुख्य, कॅल्शियम, मॅग्नेशियम व गंधक या दुय्यम आणि जस्त व बोरॉन या सुक्ष्म अन्नद्रव्यांची नितांत आवश्यकता असते. ही सर्व अन्नद्रव्ये झाडांना पुरेशा प्रमाणात वेळीच मिळाली तर झाडांची रोगप्रतिकारशक्ती वाढून ती सुदृढ बनतात.




ही सर्व अन्नद्रव्ये मातीत पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहे की नाही, याची खातरजमा शेतकरी कधीच करीत नाहीत. पिकांना खते देताना शेतकरी नत्र, स्फुरद व पालाशवर अधिक भर देत असून, दुय्यम व सूक्ष्म अन्नद्रव्यांकडे दुर्लक्ष करतात. सोबतच झाडांना स्वच्छ सूर्यप्रकाश, कोरडे हवामान, पुरेसे पाणी व मातीची वाफसा स्थिती अत्यंत अवश्यक असते. यातील कोणत्याही अन्नद्रव्यांची कमतरता निर्माण झाल्यास किंवा हवामानात प्रतिकूल बदल झाल्यास झाडे कमकुवत होतात आणि त्याचे परिणाम फूल व फलधारणेसोबत उत्पादनावर होतो. झाडांमध्ये मॅग्नेशियमची कमतरता निर्माण झाली आणि त्याच काळात कडाक्याच्या थंडीमुळे मातीचे तापमान खालावले, तर झाडांची पाने लालसर होऊन गळतात. कपाशीचे संपूर्ण शेत लाल दिसत असल्याने शेतकऱ्यांनी याचे ’लाल्या’ नामकरण केले आहे. स्वच्छ सूर्यप्रकाशामुळे झाडे प्रकाशसंश्लेषणाद्वारे पुरेसे अन्न तयार करतात. मॅग्नेशियम झाडांमध्ये हरितद्रव्य तयार करण्याच्या प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावतो. झाडांमध्ये मॅग्नेशियमची कमतरता निर्माण झाली तर आणि पानांच्या शिरा, नंतर पानांच्या कडा व पुढे संपूर्ण पान लाल होते.

**मातीचे तापमान**

कडाक्याच्या थंडीमुळे मातीचे तापमान खालावत असल्याने झाडांची जमिनीतील अन्नद्रव्ये शोषून घेण्याची प्रक्रिया खूपच मंदावते. पानांमधील हार्मोनल असंतुलित होऊन कॅल्शियम, मॅग्नेशियम व बोरॉन या घटकांचे शोषण घटते.त्यातून लाल्याची समस्या निर्माण होत असल्याने अशा परिस्थितीत झाडांना हलके पाणी देणे किंवा जमिनीवर धूर करून मातीचे तापमान टिकवून ठेवणे गरजेचे असते.


हवेतील अतिआर्द्रता व अधिक काळ सूर्यप्रकाशचा अभाव याही बाबी लाल्यास कारणीभूत ठरतात.




# थंडी वाढली की रक्तदाबाचा धोका वाढतो, वेळीच व्हा सावध; तज्ज्ञांना महत्वाचा सल्ला

**दि.२७विदर्भ प्रजासत्ताक**

हिवाळा वाढला की आरोग्याच्या समस्याही वाढू लागतात. कारण या वातावरणात शरीरातील नसा आकुंचन पावतात आणि रक्ताचा प्रवाह कमी होतो. यामुळे रक्तदाब वाढण्याचा धोका वाढतो. या दिवसात रक्तदाबाचे अनेक रुग्ण उपचारासाठी दाखल होत असतात. हा धोका टाळण्यासाठी तुम्ही तज्ज्ञांनी सांगितलेल्या काही टिप्स फॉलो करू शकता आणि हिवाळ्यात निरोगी आयुष्य जगू शकता.



हिवाळ्यात नाकातील नसा पातळ असल्यामुळे त्या दाबामुळे फुटू शकतात. त्यामुळे रक्तदाब वाढलेल्या रुग्णांना नाकातून रक्तस्राव होण्याची शक्यता अधिक असते. तज्ज्ञांच्या मते गेल्या काही दिवसांत रक्तदाब वाढलेल्या रुग्णांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. बाह्यरुग्ण विभाग तसेच आपत्कालीन विभागात रुग्ण येत आहेत आणि त्यांच्यावर तपासणी करून औषधोपचार दिले जात आहेत.

थंडी वाढल्याने लोकांच्या दैनंदिन सवयी, आहार आणि जीवनशैली बदलली आहे. अनेक जण ऊब मिळवण्यासाठी कमी फिरतात, जास्त खाणे-पिणे किंवा असंतुलित आहार घेतात. यामुळे वजन वाढते आणि रक्तदाब नियंत्रणात राहत नाही. डॉक्टरांनी सूचित केले आहे की, अशा काळात सतर्क राहणे अत्यंत आवश्यक आहे. अन्यथा निष्काळजीपणा गंभीर आरोग्य समस्या निर्माण करू शकतो.

# जमिनीचे आरोग्य सुधारणे व उत्पादन वाढीसाठी नैसर्गिक शेती करा-जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळेचे आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**

आज जागतिक स्तरावर सुरक्षित अन्नपदार्थांचा प्रश्न भेडसावत असताना, शेतीमालासाठी होणारा रासायनिक कीटकनाशकांचा ९५ टक्क्यांहून अधिक वापर ही एक मोठी चिंता आहे. रासायनिक निविष्ठांच्या अति वापरामुळे जमिनीचा कस कमी होत चालला असून मानवी आरोग्यावरही त्याचे दुष्परिणाम दिसून येत आहेत. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांनी आता नैसर्गिक (जैविक व सेंद्रीय) निविष्ठांचा वापर वाढवून ’रेसिड्यु फ्री’ शेतीकडे वळणे काळाची गरज बनली आहे. यासाठी शेतकरी बांधवांनी जिवाणू संघाचा उपयोग शेती व शेतीपिकांच्या उत्पादन वाढीसाठी करावा, असे आवाहन जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळेव्दारे करण्यात आले आहे.

अमरावती येथील जैविक किड नियंत्रण प्रयोगशाळा, कृषि संकुल, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रोड (पिन कोड ४४४६०२) येथे शेतकऱ्यांसाठी महत्त्वाच्या जीवाणू संघांची उपलब्धता करण्यात आली आहे. प्रयोगशाळेला संपर्क करण्यासाठी ०७२१-२५५०३७२ संपर्कक्रमांक दिला आहे.

या प्रयोगशाळेत पुढीलप्रमाणे जैविक निविष्ठा उपलब्ध आहेत. नत्र स्थिरीकरण करणारे जिवाणू : रायझोबियम, अझॉटोबक्टर, स्फुरद (फॉस्फरस) विरघळविणारे जिवाणू, पालाश (पोटॅश) विरघळविणारे व वहन करणारे जिवाणू, द्रवरूप जिवाणू संघ: वरील नमूद तिन्ही जिवाणू एकत्रित असलेले द्रावण आदींचे उत्पादन शासनाने ठरवून दिलेल्या दरांनुसार व नियमांनुसार वैयक्तिक शेतकऱ्यांना विक्रीसाठी उपलब्ध आहेत. तसेच या प्रयोगशाळेव्दारे महाविद्यालयीन विविध शाखेतील विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या जिवाणु उत्पादनाबाबत व त्यांच्या कार्यपद्धतीबाबत विस्तृत माहिती व प्रात्यक्षिकाद्वारे प्रशिक्षण देण्यात येते.१०० मिली बॉटल ५०/- रुपये, २५० मिली बॉटल ११०/- रुपये तर ५०० मिली बॉटल २१०/- रुपये या शासकीय विक्री दराप्रमाणे जिवाणूसंघाचा विक्री दर आहे.

## जिवाणू संघाची उपयोगिता व उपलब्धतेबाबत जनजागृती




रासायनिक खतांच्या अतिवापराने जमिनीचा पोत खालावत चालला आहे. तिचे आरोग्य सुधारवयाचे असेल तर नैसर्गिक (जैविक व सेंद्रीय) निविष्ठांचा वापर वाढवणे ही काळाची गरज आहे. त्यांच्या वापरामुळे जमिनीतील सेंद्रीय घटकांचे प्रमाण सुधारण्यात मदत होते. जिवाणू संघाच्या वापराचा दुरगामी, शाश्वत, अनुकूल परिणाम मृदा, जल, मानवी व इतर जैव परिसंस्थेवर होतो. जैविक निविष्ठांचे बहुआयामी फायदे आहेत. जैविक खतांचा वापर वाढवल्यास जमिनीचे आरोग्य सुधारते आणि उत्पादन खर्चात कपात होते. याचे फायदे केवळ शेतीपुरते मर्यादित नसून ते पर्यावरण आणि मानवी आरोग्यासाठीही महत्त्वाचे आहेत.

जैविक खतामुळे जमिनीचा पोत सुधारतो, जमीन भुसभुशीत होते व उत्पादन क्षमतेत वाढ होते, जमीनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता वाढते, तापमान नियंत्रणात ठेवण्यास मदत होते, असे भौतिक फायदे आहेत. जैविक खतामुळे जमिनीतील अन्नद्रव्य धरुन ठेवली जातात, दुबार पेरणीसाठी उपयुक्त नत्रसाठा शिल्लक राहतो, जमीनीचा सामु (कि) नियंत्रणात राहतो, याप्रमाणे रासायनिक फायदे आहेत. जैविक फायद्यांचे सांगावयाचे झाल्यास सुक्ष्म जिवांमार्फत सेंद्रीय घटकांचे विघटन होते, प्रदुषणकारक घटकांचे विघटन होते. तसेच रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी झाल्याने उत्पादन खर्च कमी होतो. धान्याचा दर्जा सुधारून पिकाचे उत्पादन वाढते. रसायनांचा वापर टाळल्यामुळे पर्यावरणाचे संतुलन राखले जाते आणि मानवी आरोग्य सुधारते.

सेंद्रिय (जैविक) शेतीला चालना देण्यासाठी आणि रासायनिक खते व कीटकनाशकांचा वापर कमी करण्यासाठी अमरावती येथील प्रयोगशाळेत तयार होणारी जैविक खते आपल्या शेतीसाठी वापरावीत, असे आवाहन प्रसिध्दीपत्रकाच्या माध्यमातून जैविक प्रयोगशाळेच्यावतीने करण्यात आले आहे. नैसर्गिक शेतीकडे वळल्यास शेतकऱ्यांना शाश्वत शेती, उत्तम उत्पादन आणि सुरक्षित अन्नपदार्थ मिळवण्याचा मार्ग सुकर होईल.

# आंबिया बहार फळपीक विमा मंजूर:

## ३ हजार ९१० शेतकऱ्यांच्याखात्यात लवकरच जमा होणार नुकसान भरपाई



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती,**

प्रधानमंत्री पिक विमा योजना अंतर्गत पुनर्रचित हवामानावर आधारित फळपीक विमा योजना आंबिया बहार २०२४-२५ मध्ये अमरावती जिल्ह्यातील ३ हजार ९१० शेतकऱ्यांसाठी १८.३० कोटी रुपयांची नुकसान भरपाई मंजूर करण्यात आली आहे.

अमरावती जिल्ह्यात या योजनेत सुमारे ४ हजार शेतकऱ्यांनी सहभाग नोंदविला होता, परंतु हवामान धोके (ट्रिगर) लागू करण्याबाबत शासन निर्णयातील कमाल व किमान तापमानाची स्पष्टता नसल्यामुळे युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनीने आक्षेप घेतला होता. जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि लोकप्रतिनिधींनी केलेल्या पाठपुराव्यानंतर कंपनीने केळी पिकासाठी १२ महसूल मंडळांत, मोसंबीसाठी १० महसूल मंडळांत आणि संत्रा पिकासाठी ४५ महसूल मंडळांत अखेर हवामान धोके मंजूर केले.

यामध्ये, १३८ केळी उत्पादकांना ९१.३९ लक्ष रुपये, ४६ मोसंबी उत्पादकांना ११.६२ लक्ष रुपये, तर ३ हजार ७२६ संत्रा उत्पादकांना १७.२७ कोटी रुपये असे एकूण ३ हजार ९१० शेतकऱ्यांसाठी १८.३० कोटी रुपये इतकी नुकसान भरपाई मंजूर झाली आहे. ही रक्कम लवकरच अर्जदार शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग केली जाईल, अशी माहिती कंपनीने दिली असून, प्रलंबित दावे मंजूर झाल्यामुळे जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी शेतकऱ्यांना आंबिया बहार २०२५-२६ मध्ये मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

# आमचे रक्षण, आमची जबाबदारी: सीतारामपेठ गावाच्या आजूबाजूला १३ वाघांचा वावर, चार महिला करतात शाळकरी मुलांचे रक्षण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२८चंद्रपूर-** चंद्रपूर जिल्ह्यातील सीतारामपेठ गावात १३ वाघांच्या सततच्या वावरामुळे शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला आहे. अशा परिस्थितीत किरण गेडाम, वेणू रंदये, रिना नाट आणि सीमा मडावी या चार महिलांनी ’आमचे रक्षण, आमची जबाबदारी’ हा दृष्टिकोन ठेवून मुलांचे रक्षण करण्याची जबाबदारी स्वतःहून उचलली आहे. पूर्व विदर्भात वाढत असलेल्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा उपक्रम महत्त्वाचा ठरत आहे.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या मोहर्ली परिक्षेत्रातील सीतारामपेठ गावाभोवती तब्बल १३ वाघांचा वावर आहे. गावापासून जंगलालगतचा ४०० मीटरचा रस्ता अंधारलेला असल्याने शाळकरी मुलांना शाळेत ये-जा करताना वाघांच्या हल्ल्याचा धोका असतो.

या चार महिला दररोज सकाळी आणि सायंकाळी मुलांच्या संरक्षणासाठी गावात आणि शाळेच्या मार्गावर गस्त घालतात. उपसंचालक (बफर), ताडोबा प्रकल्प यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी हा उपक्रम सुरू केला आहे. मुलांचे भविष्य आणि गावाची सुरक्षितता या उद्देशाने त्या कोणताही मोबदला न घेता हे धाडसाचे कार्य करत आहेत.

सीतारामपेठ येथील अनेक मुले शिक्षणासाठी चंद्रपूर येथे जातात. हा परिसर जंगलव्याप्तअसल्याने वन्यप्राण्यांचा, विशेषतः वाघांचा, मोठ्या प्रमाणात वावर असतो.



वनविभागाकडून मानव-वन्यजीव संघर्ष टाळण्यासाठी विविध उपाययोजना केल्या जात असल्या तरी, या महिलांनी स्वतःहून पुढाकार घेऊन वनखात्याला सहकार्य करत मुलांची सुरक्षित ने-आण करण्याची जबाबदारी घेतली आहे.

१३ वाघांच्या सततच्या धोक्यामुळे घरात न बसता, या महिलांनी दाखवलेले धैर्य आणि गावकऱ्यांच्या सुरक्षेसाठी घेतलेला पुढाकार ताडोबा परिसरातील इतरांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. २८ नोव्हेंबर २०२५ शहर/ग्रामिण

# प्रचाराला सुरुवात; उमेदवारांकडून 'डाव-प्रतिडाव' टाकणे सुरू !

## प्रभागनिहाय मतदारांचे व्हॉट्सअ‍ॅप ग्रुपही सक्रिय, मतदारांना प्रभागातील समस्या सोडविण्याचे आश्वासन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ धारणी** - पालिका निवडणुकीत बहुरंगी मुकाबला होणार असल्याचे चित्र स्पष्ट होत असताना, काही ठिकाणी ही लढत अटीतटीची होण्याची शक्यता आहे. सर्व पक्षांकडून प्रचार सुरू असला तरी, काही प्रभागात 'सेटलमेंट' करून आपल्या उमेदवाराचा विजय सोपा करण्याचे प्रयत्न आगामी काळात होऊ शकतात, अशी चर्चा आहे. यासाठी 'साम-दाम'चे तंत्र वापरले जाण्याचीही शक्यता व्यक्त केली जात असून, विरोधी उमेदवारांसह स्वतःच्या सहकारी उमेदवारांवरही लक्ष ठेवण्याची गरज असल्याचे चित्र दिसत आहे. निवडणूक जिंकण्यासाठी प्रमुख उमेदवारांकडून डाव-प्रतिडाव टाकणेही सुरू झाल्याचे दिसत आहे. नगरपरिषद निवडणूक आता रंगतदार टप्प्यात पोहोचली आहे. नगराध्यक्षपदाच्या सर्व प्रमुख उमेदवारांनी मतदारांच्या प्रत्यक्ष भेटींना प्राधान्य दिले आहे. ज्या प्रभागात ते प्रचारासाठी जात आहेत, तेथील उमेदवार आणि पक्षाचे कार्यकर्ते सोबत घेतले जात आहेत. प्रचारादरम्यान उमेदवारांना आणि कार्यकर्त्यांना सर्वत्र नागरिकांच्या तक्रारी, प्रश्न आणि समस्या ऐकाव्या लागत आहेत. विशेषतः रस्ते, नाल्या, स्वच्छता आणि पथदिवे यांसंबंधी नागरिकांमध्ये नाराजीचा सूर दिसून येतो.सर्वच पक्षांचे उमेदवार या समस्या सोडवण्याची हमी देत आहेत. पुनर्निवडणुकीत पुन्हा उमेदवारी मिळालेल्या काही माजी नगरसेवकांना 'आधी केलेली कामे सांगा, नंतर पुढचं बोला' अशी सरळ विचारणा मतदारांकडून होत असल्याचे विरोधी उमेदवार सांगत आहेत. त्यामुळे निवडणूक दिवसेंदिवस अधिक रंगतदार होईल, असे संकेत स्पष्टपणे दिसत आहेत. दुसरीकडे, उमेदवारांनी गुप्त बैठका, गठ्ठा मतदारांची जुळवाजुळव, नाराज कार्यकर्त्यांना सक्रिय करणे आणि बाहेरगावी असलेल्या मतदारांशी संपर्क साधणे यांसारख्या प्रक्रिया वेगाने सुरू केल्या आहेत.




### एकतरी सभा द्या; कार्यकर्त्यांचा आग्रह

स्थानिक प्रचार यंत्रणेबरोबरच पक्षाच्या स्टार प्रचारकांच्या सभा आयोजित करण्याची धडपड सध्या सर्वच प्रमुख पक्षांची दिसून येत आहे. त्यासाठी वरिष्ठ नेत्यांना 'एकतरी सभा द्या असा आग्रह स्थानिक कार्यकर्ते करताहेत. आगामी काळात सर्वच प्रमुख पक्षांच्या नेत्यांच्या जाहीर सभा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यातल्या त्यात आक्रमक भाषण करणाऱ्या नेत्यांची मागणी सर्वच पक्षांचे कार्यकर्ते करताना दिसत आहेत.

## नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकीमुळे संबंधित क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांना१ आणि २ डिसेंबर रोजी सुटी जाहीर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**- अमरावती जिल्ह्यात आगामी नगरपरिषद/नगरपंचायत सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार, नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकीमुळे संबंधित क्षेत्रातील शैक्षणिक संस्थांना १आणि २ डिसेंबर २०२५ रोजी सुटी राहणार असल्याचे जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.निवडणुकीच्या कामासाठी मतदान अधिकारी, कर्मचारी यांना मतदान साहित्य घेऊन जाणे व मतदानाची प्रक्रिया सुरळीत पार पाडता यावी, यासाठी अमरावती जिल्ह्यातील संबंधित सर्व नगरपरिषद/नगरपंचायत क्षेत्रातील शाळा आणि महाविद्यालयांना सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. २ डिसेंबर रोजी अध्यक्ष व सदस्य पदाकरिता मतदान होणार आहे.



# फ्री फ्लॅपद्वारे जिभेच्या कर्करोगावर यशस्वी शस्त्रक्रिया


## सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे यश, अनेक आव्हानांवर मात करून रुग्णाला बोलते केले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**- विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल)येथे फ्री फ्लॅपद्वारे कर्करोगाची शस्त्रक्रिया करण्यात आली. रुग्ण हा ४९ वर्षाचा असून रा.गणोरी, ता.भातकुली, जि.अमरावती येथील रहिवासी आहे. या रुग्णास एकदाच नव्हे तर दुसऱ्यांदा कर्करोग झाला. पहिल्यांदा शस्त्रक्रिया केली तेव्हा जबड्याचा मोठा भाग काढावा लागला होता. गालातील कर्करोग काढण्यात आला होता. मानेतील कर्करोगाच्या ग्रंथी काढल्या होत्या आणि छातीतील स्नायू वापरून तोंडाची पुनर्बांधणी करण्यात आली होती. पीएमएमसी फ्लॅपद्वारे ट्रीटमेंट संपली असे वाटत असतानाच, पुन्हा एकदा आणि आता थेट जीभेला कर्करोग झाला. त्यामुळे या रुग्णावर ही दुसरी शस्त्रक्रिया म्हणजे जीवन-मरणाचा संघर्ष होता. रुग्णाची तोंडाची रचना आधीच बदललेली. रक्तवाहिन्या आधीच वापरलेल्या. जखमा, चिरा, जुनी पुनर्बांधणी सर्व काही अडचणी असताना जिभेच्या कर्करोगाची शस्त्रक्रिया करणे गरजेचे असल्यामुळे शस्त्रक्रिया करून जीभे वर पसरलेला पूर्ण कर्करोग काढण्यात आला. डाव्या बाजूचा जबडा थोडा काढण्यात आला.फ्री फ्लॅप तंत्राद्वारे पुनर्बांधणीसाठी वापरण्यात आली. ज्यामध्ये रुग्णाच्या हातातील त्वचा व जिवंत रक्तवाहिन्या सूक्ष्मदर्शकाखाली जोडून तोंडाची पुन्हा जिवंत पुनर्बांधणी करण्यात आली. शस्त्रक्रिया महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत विनामूल्य करण्यात आली आहे. रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली कॅन्सर तज्ञ डॉ. रोहित मुंदडा, डॉ. भुषण मुंदडा, डॉ. तक्षक देशमुख, डॉ. प्रितेश पडगव्हाणकर, बाधिरीकरण तज्ञ डॉ. राखी वानखडे, डॉ. रमणिका ढोमणे, डॉ.माधुरी गाडेकर, डॉ.रोहिणी राठोड, डॉ. ऐश्वर्या, डॉ. किरण, डॉ. स्नेहल, डॉ. प्रियंका, डॉ. साक्षी, अधिसेविका चंदा खोडके यांच्या पथकाने केली.

# भोपाळच्या नकली नोटा नागपूर, चंद्रपूर, मूर्तिजापुरात

## मालेगाव जेलमधून जुबेर ताब्यात, १ डिसेंबरपर्यंत कोठडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८परतवाडा**- मध्य प्रदेशच्या भोपाळ येथील बनावट नोटा प्रकरणांचे धागेदोरे राज्यात विखुरले आहेत.



नागपूर, चंद्रपूर, मूर्तिजापूर येथे या नोटा दिल्याचे प्राथमिक चौकशीत उघडकीस आल्यानंतर मध्यप्रदेश पोलिसांनी सायबर क्राइमच्या मदतीने चौकशी सुरू केली असल्याचे खंडवा येथील अतिरिक्त पोलिस अधीक्षक महेंद्र तोरणेकर यांनी सांगितले. मालेगाव कारागृहात असलेल्या जुबेरला बुधवारी प्रॉडक्शन वॉरंटवर खंडवा पोलिसांनी ताब्यात घेतले. त्याला न्यायालयात हजर केले जाणार आहे. या प्रकरणातील आधीचे तिन्ही आरोपी १ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडीत आहेत.

भोपाळ येथील गोकुलधाम सोसायटीमध्ये बनावट नोटांचा कारखाना चालविणारे डॉ. प्रतीक सुरेश नवलाखे (रा. बऱ्हाणपूर), गोपाल ऊर्फ राहुल मांगीलाल पनवार, (३५, रा. हरदा, ह.मु गोकुलधाम सोसायटी, बाघमुगलिया, भोपाळ) व दिनेश दीपक गोरे (४३, रा. साईनगर, धारणी, जि. अमरावती) यांना अटक करण्यात आली.खंडवा येथील न्यायालयाने त्यांना १ डिसेंबरपर्यंत पोलिस कोठडी सुनावली. यादरम्यान त्यांनी महाराष्ट्र व मध्य प्रदेशात बनावट नोटा कुणाला दिल्या, याचा खुलासा होणार आहे.

बनावट नोटा बनवण्यासाठी एका प्रिंटर मशीनचा वापर आरोपींनी केला. ती नष्ट करण्याच्या उद्देशाने त्यांनी हरदा जिल्ह्यातील टेंभुर्णी येथे नदीत फेकली. ती पोलिसांनी जप्त केली आहे.

२)मालेगाव येथील कारागृहात ३ असलेला मौलाना जुबेर हा नोटांसाठी लागणारे कागद आणत होता आणि नोटांचे कटिंग करीत असल्याचा आरोप आहे. त्याला प्रॉडक्शन वॉरंटवर खंडवा पोलिसांनी बुधवारी ताब्यात घेतले.

३)आरोपींनी मूर्तिजापूर-चंद्रपूर-३ नागपूर असा प्रवास केला. नागपुरात रात्रीला, तर चंद्रपूरला बायपास मार्गावर तसेच मूर्तिजापूर येथे एकाला नोटा दिल्याचे त्यांनी कबूल केले. हे नोटा घेणारे कोण, याच्या चौकशीसाठी सायबर क्राइमसह विविध यंत्रणा कामाला लागल्या आहेत.

# 'इस बार ना बटेंगे, ना कटेंगे; उंगली काट देंगे'; नवनीत राणा यांचा सूचक संदेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती** :- भाजपच्या नेत्या आणि माजी खासदार नवनीत राणा यांची वक्तव्ये अनेकवेळा वादग्रस्त ठरतात. आक्रमक हिंदुत्ववादी नेत्या म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे. त्या सध्या नगरपालिका, नगरपंचायतींच्या निवडणुकीच्या प्रचारात व्यस्त आहेत. त्यातच आज गुरूवारी अचलपूर येथे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या प्रचार सभेत त्यांनी पुन्हा एकदा हिंदुत्वाचा मुद्दा उपस्थित केला.

नवनीत राणा म्हणाल्या, विधानसभा निवडणुकीच्या वेळी उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांची जाहीर सभा परतवाडा येथे झाली होती, तेव्हा 'बटोगे तो कटोगे', अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या होत्या. लोकांना संदेश दिला होता. पण, 'इस बार ना बटेंगे, ना कटेंगे, एक भी रहेंगे और सेफ भी रहेंगे'. काल-परवा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी अयोध्येतील श्रीरामांच्या मंदिरावर धर्मध्वज फडकवला. पाकिस्तानकडून त्यावर तीव्र प्रतिक्रिया येत आहेत. मी तुम्हाला आवाहन करते की, 'जो धर्मध्वजपर उंगली उठाता है, उसकी उंगली काट देना चाहिये'.

नवनीत राणा म्हणाल्या, प्रत्यक्ष जाऊन बोट कापण्याची



आवश्यकता नाही. ते हिंदूंच्या विरोधात जर एकत्र येत असतील, तर आम्हालाही बाहेर येऊन आमची एकता दाखवून दिली पाहिजे. कोणी बोट दाखवले, तर ते कापण्याचीही आपली तयारी असली पाहिजे. अचलपुरात आपण एकत्र राहिलो, तर कुणीही दुर्गादेवीवर दगड फेकण्याची हिंमत करणार नाही.

आपण एकजूट असलो, तर गणेशोत्सवाच्या काळात कुणी हिरवा झेंडा घेऊन आपल्यासमोर उभा ठाकणार नाही. आमच्या आई-बहिणींकडे कुणी वाकड्या नजरेने पाहू शकणार नाही. ही एकजूटता आपल्याला प्रत्येकवेळी दाखवायची आहे.

नवनीत राणा म्हणाल्या, भाजपमध्ये निष्ठावंत कार्यकर्त्याला नक्कीच न्याय मिळतो. फक्त पक्षासाठी लढण्याची तयारी असायला हवी. येथील कार्यकर्ते अभय माथने यांच्यावर पक्षाचे कार्य करीत असताना अनेकवेळा गुन्हे दाखल झाले. पण, त्यांनी संघर्ष कायम ठेवला. २३ वर्षांपासून ते संघर्ष करीत आहेत. आता त्यांना त्याचे फळ मिळाले आहे. त्यांच्या पत्नी रुपाली माथने यांना भाजपने नगराध्यक्षपदाची जबाबदारी दिली आहे.

आम्ही सर्वजण माथने यांच्या पाठीशी उभे आहोत. पक्षासाठी काम करणारे अनेक कार्यकर्ते आहेत. त्यांची दखल निश्चितपणे भाजप घेत असते. आम्ही कुठल्या व्यक्तीसाठी नाही, तर आमच्या भगव्याच्या रक्षणासाठी प्राण देणाऱ्यांपैकी आहोत. त्यामुळे यावेळी विजयाची चिंताच बाळगण्याची गरज नाही. सर्वच जागांवर भाजपचे कमळ फुलणार आहे.

# हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिबजी शहिदी समागमनागपूर येथील कार्यक्रमासाठी सर्वोतोपरी सहकार्य-जिल्हाधिकारी आशिष येरेकर

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८अमरावती,**
हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ रोजी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी जाणाऱ्या जिल्ह्यातील नागरिकांना जिल्हा प्रशासनातर्फे सर्वोतोपरी सहकार्य केल्या जाईल, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी दिली. जिल्हाधिकारी कार्यालयात आज नागपूर येथील कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने बैठक घेण्यात आली. यावेळी नानकराम अहुजा, ड. वासुदेव नवलानी, अमरज्योतसिंग जग्गी, रविंद्रसिंग सलुजा, डॉ. निख्खू खालसा, राजेंद्रसिंग सलुजा, राज छाबडा, दिनेश सचदेव, राजू मोंगा, सरनपालसिंग अरोरा, हरबक्श उपवेजा, सजिंदरसिंग उपवेजा, कुलदेवसिंग अरोरा, भजनसिंग सुलजा, विक्की अरोरा यांच्यासह विविध समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी राज्य शासनाच्या पुढाकारातून हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. राज्यात नागपूरसह नांदेड आणि नवी मुंबई येथे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. शहिदी समागमाचे शिख समाजात विशेष महत्व आहे. त्यामुळे या कार्यक्रमांना नागरिक मोठ्या प्रमाणावर जातील. त्यांची कोणतीही गैरसोय होणार नाही, याची काळजी जिल्हा प्रशासन घेईल. इतर जिल्ह्यामधून नागपूर येथे जाताना नागरिकांना वैद्यकीय आणि इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. कार्यक्रमाच्या प्रचारासाठी जिल्ह्यात चित्ररथ फिरविण्यात येणार आहे. तसेच येत्या काळात होर्डींग आणि इतर माध्यमातून प्रसिद्धी करण्यात येणार आहे. कार्यक्रमाच्या अनुषंगाने ५ डिसेंबर रोजी ४०० नागरिकांचा जत्था येणार आहे. यानिमित्ताने वाहतुकीसाठी कोणतीही अडचण होणार नाही. यासाठी पोलिसांना निर्देश देण्यात येणार आहे. त्यामुळे समाजाने यात सक्रीय सहभाग नोंदवावा, असे आवाहन श्री. येरेकर यांनी केले.नागपूर येथे उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम होणार आहे. यानिमित्ताने निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. यावेळी विविध समाजाच्या प्रतिनिधींनी कार्यक्रमाच्या अनुषंगाने केलेल्या तयारीची माहिती दिली.



# १५ रेल्वे स्थानकांवर ४९ 'एटीव्हीएम'ची सुविधा, १२ सहायक मदतीला

## तिकिटांसाठी रांगेत न थांबता जलद आणि सुलभ पद्धतीने मिळणार तिकीट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**- मध्य रेल्वे विभागात येणाऱ्या १५ स्थानकावर'ऑटोमॅटिक टिकट व्हेंडिंग मशीन' (एटीव्हीएम) उपलब्ध करून देण्यात आली आहेत. तसेच क्यूआर कोड आणि यूपीआय आयडीद्वारे डिजिटल पेमेंटची सुविधाही अधिक सक्षम करण्यात आली आहे.

प्रवाशांना तिकिटांसाठी रांगेत न थांबता जलद आणि सुलभ पद्धतीने तिकीट मिळावे, 'डिजिटल तिकीटला प्रोत्साहन आणि 'सेल्फ-टिकिटिंग'ची संस्कृती वाढीस लागावी हा यामागील उद्धेश आहे. भुसावळ विभागात एकूण १५ स्थानकांवर ४९ एटीव्हीएम बसवण्यात आले आहेत. या मशीनचा सहज उपयोग करता यावा यासाठी १२ प्रशिक्षित सहाय्यकांची नियुक्ती करण्यात आली आहे. हे सहाय्यक स्थानक परिसरात प्रवाशांना एटीव्हीएमद्वारे तिकीट कसे काढायचे याबाबत मार्गदर्शन करत आहेत.

भुसावळ विभागातील मलकापूर, शेगाव,अकोला, बडनेरा, अमरावती, देवळाली, नाशिक रोड, मनमाड, चाळीसगाव, पाचोरा, जळगाव, भुसावळ, मुर्तिजापूर, बुरहानपूर आणि खंडवा या प्रमुख स्थानकांवर एटीव्हीएमची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. एटीव्हीएमचा वापर, त्याचे फायदे आणि विशेषतांचा माहिती करून देणारे सूचना फलक स्थानकांवर लावण्यात आले आहेत. तसेच एटीव्हीएमचा वापर वाढविण्यासाठी वाणिज्य विभागातील निरीक्षक आणि





कर्मचाऱ्यांच्या चमू कडून सातत्याने जनजागृती केली जात आहे.

**२७ टक्के वाढ**- या चौफेर प्रयत्नांमुळे भुसावळ विभागातील एटीव्हीएममधून होणाऱ्या तिकीट विक्रीत उल्लेखनीय वाढ झाली आहे. मागील वर्षी १ एप्रिल ते १५ नोव्हेंबर २०२४ या कालावधीत एटीव्हीएमद्वारे ९ लाख ४९ हजार २८७तिकिटे विक्री झाली होती. चालू वर्षी या कालावधीत १ एप्रिल ते १५ नोव्हेंबर २०२५ मध्ये ही संख्या वाढून १२ लाख २ हजार ५ वर पोहोचली. म्हणजेच तब्बल २६.८२ टक्के वाढ नोंदविण्यात आली आहे. एटीव्हीएमचा अधिकाधिक वापर व्हावा यासाठी वाणिज्य विभागाच्या निरीक्षक व कर्मचाऱ्यांद्वारे नियमितपणे मार्गदर्शन मोहीम राबवली जात आहे. एटीव्हीएमद्वारे तिकीट देण्यासाठी फॅसिलिटेटर्सचीही नियुक्ती करण्यात आली आहे.

तिकीट काउंटरवरील कर्मचारीसुद्धा प्रवाशांना या सुविधेचा लाभ घेण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन करत आहेत. प्रवाशांना ऑनलाइन पेमेंट, एटीव्हीएमद्वारे तिकीट घेण्याची प्रक्रिया आणि त्याचे फायदे याबाबत माहिती देण्यात येत आहे. विविध स्थानकांवर हेल्प डेस्कचीही व्यवस्था करण्यात आली असून तिकीट तपासनीस व बुकिंग स्टाफ एटीव्हीएमविषयी प्रवाशांना प्रत्यक्ष मार्गदर्शन करत आहेत. यामुळे प्रवासी ही आधुनिक सुविधा अधिक सोयीस्करपणे वापरत आहेत.

# निवडणुकीची धामधूमः नेते, कार्यकर्त्यांकडून पांढऱ्या कपड्यांना होतेय मोठी मागणी

## स्टार्चच्या कपड्यांना दिले जातेय प्राधान्य

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**


पुढारी म्हणजे खादीचे कपडे हे अनन्यसाधारण समीकरण आहे. आपल्याकडे कोणत्याही राजकीय नेत्याची खादीच्या कपड्यांना सर्वाधिक पसंती असते. त्यामुळे बहुतांश नेते हे खादी परिधान केलेले दिसतात. खादीचा कुर्ता आणि पायजमा हा आजच्या काळातही राजकीय नेत्यांचा गणवेश म्हणावा, इतका सर्वमान्य झाला आहो. त्यामुळे नगरपालिका, नगरपंचायती व इतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर खादीच्या कपड्यांना मागणी वाढली आहे.

सगळीकडे सध्या नगरपरिषदा आणि नगर पंचायतीच्या निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. प्रचारादरम्यान कडक पांढऱ्या कपड्यांना मोठी मागणी सध्या पाहायला मिळत आहे. अंगावरील पोशाखामुळे माणसाचे व्यक्तिमत्त्व खुलते. कपडे स्वच्छ आणि नीटनेटके असले, तर त्या व्यक्तीकडे लोकही आकर्षित होतात. त्यामुळे निवडणुकीच्या या धामधुमीत अनेक उमेदवार प्रचारासोबतच आपल्या अंगावरील पोशाखावर खास लक्ष देत आहेत. पांढरा शुभ्र स्टार्च केलेला कपडा अंगावर परिधान करून उमेदवार तथा त्यांचे काही कार्यकर्तेही मतदारांच्या गाठीभेटी घेत आहेत. कपड्यांना तर फार महत्त्व आहेच, चहाच्या टपरीसोबतच लाँड्रीवालाही ठरलेला आहे. त्याच्याकडूनच हे कपडे स्वच्छ धुऊन स्टार्च केले जात आहेत. सगळीकडे सध्या येथील नगरपंचायत निवडणुकीची रणधुमाळी पाहायला मिळत आहे. त्यामुळेच प्रचारादरम्यान कडक पांढऱ्या कपड्यांना मोठी मागणी सध्या पाहायला मिळत आहे.



निवडणुकीच्या काळात उमेदवार व त्यांचे कार्यकर्ते गावोगावी प्रचार करत फिरत असतात. आपण रुबाबदार कपड्यात एक वजनदार माणूस वाटावे अशी प्रत्येकाची अपेक्षा असते. त्यामुळे आपल्याकडे लोकांचे एक आकर्षण असावे यासाठी उमेदवार किंवा त्यांचे कार्यकर्ते तशा रुबाबदार कपड्याकडे जास्त लक्ष देत असतात. निवडणुका आल्या की कार्यकर्त्यांच्याही पोशाखामध्ये बदल पाहायला मिळतो. कार्यकर्त्यांना कपडेदेखील तसेच कडक हवे आहेत. त्यामुळे बाजारातही सध्या कापड दुकानामध्ये गर्दी देखील पाहायला मिळत आहे. कार्यकर्ते व उमेदवार हे लोकांसमोर एक वेगळी छाप पडेल, असे कपडे मिळविण्यासाठी उत्सुक असल्याचे चित्र सध्या बाजारात पाहायला मिळत आहे. त्याचमुळे सध्या बाजारात या कपड्यांना मागणी वाढली आहे. यामध्ये कुर्ता, पायजमा तर हवाच पण तोदेखील कडकच असायला हवा यासाठी प्रयत्न केले जात आहेत. त्यामुळे यासाठी स्टार्चच्या कपड्यांना प्राधान्य दिले जात आहे.

## कर न भरल्याने शेंदोळा खुर्दची सरपंच तृप्ती निस्ताने व दोन सदस्य अपात्र; गावात खळबळ



**विदर्भ प्रजासत्ताकदि.२८तिवसा**

शेंदोळा खुर्द ग्रामपंचायतीत धक्कादायक प्रकार उघड झाला असून, इतर ग्रामस्थांना वेळेत कर भरण्याच्या सूचना करणाऱ्या पदाधिकाऱ्यांनीच स्वतःचे थकीत कर न भरल्यामुळे सरपंच तृप्ती सचिन निस्ताने, सदस्य दिलीप काळमेघ आणि सदस्य रेखा गणेश यांना अपात्र ठरविण्यात आले आहे. ग्रामपंचायत सदस्य आशिष निस्ताने यांनी केलेल्या तक्रारीवरून ही कारवाई करण्यात आली.

मिळालेल्या माहितीनुसार, महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ च्या कलम १४(१)(ह) अंतर्गत मागणी बिल मिळाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत ग्रामपंचायतीचा कर न भरणाऱ्या व्यक्तीस सरपंच किंवा सदस्य राहता येत नाही. या कलमानुसारच अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी १८ फेब्रुवारी २०२४ रोजी तिघांवर अपात्रतेची कारवाई केली होती. संबंधितांनी अप्पर आयुक्तांकडे अपील दाखल केले, मात्र सर्व पुराव्यांच्या तपासणीनंतर अपील फेटाळत जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश कायम ठेवण्यात आला.दरम्यान, शेंदोळा खुर्द ग्रामपंचायतीत उपसरपंच पद २ मार्च २०२३ पासून न्यायायिक प्रक्रियेच्या स्थगितीमुळे रिक्त असून आता त्याच वार्डातील तिन्ही सदस्य अपात्र ठरल्यानं वार्ड क्र. ३ अक्षरशः पोरका झाला आहे. सध्या ग्रामपंचायतीचे कामकाज प्राधिकृत अधिकाऱ्यांच्या देखरेखीखाली सुरू असून रिक्त पदांचा अहवाल शासनाकडे पाठविण्यात आला आहे. ग्रामपंचायतीचा कार्यकाळ १४ फेब्रुवारी २०२६ रोजी संपणार आहे.

शासनाने २०२२-२३ मधील थकित कराबाबत सर्व पदाधिकाऱ्यांना मागणी नोटीस बजावली होती. नियमाप्रमाणे ९० दिवसांच्या आत कराचा भरणा करणे बंधनकारक होते. मात्र सरपंच व दोन सदस्यांनी ठराविक मुदतीत कर न भरल्याचे स्पष्ट झाल्याने कारवाई अपरिहार्य ठरली. या घटनाक्रमामुळे ग्रामस्थांमध्ये 'कर चुकवेगिरी नको' असा सूर जोर धरताना दिसत आहे.

### सावता मैदान हत्या प्रकरण

## रेल्वेचा कोणताही संबंध नाही


**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८बडनेरा-** बडनेरा येथील सावता मैदान (नव्या वस्ती) परिसरात घडलेल्या २५ ला घडलेल्या हत्याकाडा बाबत काही माध्यमांनी रेल्वे चना-फुटाणा वाद अशी चुकीची माहिती प्रसारित केली होती.

त्यावर रेल्वे सुरक्षा बल (आरपीएफ) बडनेरा यांनी स्पष्टीकरण जारी केले आहे. आरपीएफच्या सखोल चौकशीनुसार, ही घटना रेल्वे हद्दीबाहेरील भागात घडली असून तिचा रेल्वे, आरपीएफ किंवा जीआरपी यांच्याशी कोणताही संबंध नाही. मृत ऋषिकेश राजू खपरेकर हे खासगी मॉलमध्ये कर्मचारी होते, तर मुख्य आरोपी मोहम्मद तौफिक शेख शाकूर यांचाही रेल्वेशी कसलाच संबंध नाही. ही पूर्णतः व्यक्तिगत वादातून उद्भवलेली घटना आहे, प्रकरण बडनेरा शहर पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ०६४१/२०२५ अंतर्गत नोंद झाले असून भारतीय न्याय संहिता २०२३ नुसार 'नॉन-रेल्वे केस' म्हणून तपास सुरू आहे. रेल्वे प्रशासनाने ही दुर्दैवी घटना रेल्वेच्या कार्यक्षेत्राबाहेर असल्याचे पुन्हा स्पष्ट केले आहे.

## तळेगाव ठाकूर या गावात दि.१ डिसेंबर पासून श्री.दत्त जयंती महोत्सव ला सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८तिवसा**

तिवसा तालुक्यातील तळेगाव ठाकूर या गावात दि.१ डिसेंबर २०२६ ते ५ डिसेंबर २०२६ पर्यंत श्री दत्त जयंती महोत्सव पार पडणार आहेत.तळेगाव मधील दत्त मंदिर हे पिंगळाई नदी पासून ४०० मी अंतरवार असून ते गावाच्या बाहेर उंच टेकडीवर आहेत.दत्त मंदिर निसर्गरम्य असून गोमातेचे मंदिर सुद्धा आहे.दत्त मंदिर प्राचीन काळापासून मंदिर आहे.दरवर्षी प्रमाणे ह्या वर्षी सुद्धा दत्त जयंती महोत्सव विविध धार्मिक कार्यक्रमाने पार पडणार आहेत. दि.१ डिसेंबर २०२६ ला सकाळी १० ते १ तीर्थस्थापना,अभिषेक व



आरती तसेच दुपारी १ ते ३ सामुदायिक गुरुचरित्र पारायण पार पडणार असून वाचन श्री.जगन्नाथ साबळे महाराज सुरवाडी तिवसा येथील करणार आहेत.दि.२ डिसेंबर २०२६ ला सकाळी ८ ते १० पूजाअर्चा व आरती,सकाळी ११ ते ४ गुरुचरित्र पारायण सोहळा पार पडणार असून वाचन साबळे महाराज करणार आहेत.दि.३ डिसेम्बर २०२६ ला सकाळी ८ ते १० पूजाअर्चा व आरती,सकाळी ११ ते १२ गुरुचरित्र पारायण सोहळा पार पडणार आहेत.दि. ४ डिसेंबर २०२६ ला सकाळी ८ ते १० पूजा आरती,सकाळी ११ ते ५ गुरुचरित्र पारायण तसेच १२ ते ३ लहान मुलांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडणार आहेत.नंतर दुपारी ३ ते ५ दत्त जन्मोस्तव,भजन व आरती पार पडणार आहेत.दि.५ डिसेंबर २०२६ रोजी सकाळी ८ ते १० पूजाअर्चा,आरती,सकाळी १० ते १२ काल्याचे कीर्तन ह.भ.प. फार्मासिस्ट श्री शंतनू धर्माळे तळेगावकर यांचा वाणीतून पार पडणार आहेत.नंतर दुपारी १२ ते ४ महाप्रसाद पार पडणार आहे.हा दत्त जयंती महोत्सव पूर्ण गावकरी मंडळी पार पाडतात.

## 'एचएसआरपी' क्रमांक जिल्ह्यात निम्याहून अधिक वाहनांना लागल्याच नाही

### ३० नोव्हेंबर शेवटची मुदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

अमरावती जिल्ह्यात उच्च सुरक्षा क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसवण्याकडे वाहन चालकांनी पाठ दाखवली आहे. अद्यापही निम्म्याहून अधिक वाहनांनी ही पाटी लावली नाही. त्यासाठी असणारी मुदत चार दिवसांनंतर संपणार आहे. इतक्या कमी कालावधीत शिल्लक वाहनांना पाटी बसवणे अशक्य आहे. त्यामुळे या वाहनांवर कारवाई होणार काय? हा प्रश्न अनुत्तरीत आहे.

राज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या प्रत्येक वाहनांना एचएसआरपी नंबरप्लेट बंधनकारक आहे. यासाठी राज्य शासनाच्या परिवहन खात्याने दुचाकी, चारचाकीसह इतर वाहनांच्या नंबरप्लेटबाबत दर व खासगी कंत्राटदार निश्चित केला. त्यानुसार राज्याच्या सर्वच जिल्ह्यात निश्चित केलेल्या केंद्रात ऑनलाईन वेळ घेऊन ही पाटी लावली जात आहे. नागपुरात शहर आणि पूर्व नागपूर अशी दोन आरटीओ कार्यालय आहेत. येथे पंधरा वर्षांच्या आत व हरित कर भरून पुनर्नोंदणी केलेली एकूण ८ लाख ३५ हजार ४७३ वाहने आहेत. त्यापैकी ४ लाख २८ हजार ५६५ वाहनांनी नंबरप्लेटसाठी पैसे भरून नोंदणी केली. त्यापैकी ३ लाख ७६ हजार ४३८ वाहनांना पाट्या लागल्या आहेत.




दरम्यान, शासनाने एचएसआरपी बसवण्यासाठीची पहिली अंतिम मुदत ३१ मार्च २०२५ दिली होती, त्यानंतर ३० जून २०२५ पर्यंत पहिली मुदतवाढ, १५ ऑगस्ट २०२५ दुसरी मुदतवाढ देण्यात आली. तर आता ३० नोव्हेंबर २०२५ ही अंतिम मुदत आहे. त्यानंतरही नागपूर शहरात अद्याप निम्याहून जास्त वाहनधारकांनी ही पाटी लावली नाही, हे विशेष. सदर विषयावर नागपूर शहराचे प्रादेशिक परिवहन अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी व्हॉट्सपवर आकडेवारी उपलब्ध केली. परंतु या विषयावर चर्चा होऊ शकली नाही.

### परिवहन खात्याकडून कारवाईचे संकेत

राज्यातील परिवहन खात्याकडून आजपर्यंत 'एचएसआरपी' क्रमांक पाटी लावण्यासाठी चार वेळा मुदतवाढ दिली गेली आहे. त्यानंतरही निम्याहून अधिक वाहनधारकांनी अद्याप पाटी लावली नाही. त्यामुळे परिवहन खात्याकडून आता मुदतीपूर्वी पाटी न लावणाऱ्यांवर कारवाईचे संकेत दिले गेले आहे. परंतु प्रत्यक्षात कारवाई होणार काय? याकडे सगळ्यांचे लक्ष लागले आहे.

## हिंद दी चादर श्री गुरू तेग बहादूर साहिबजी शहिदी समागमाच्या चित्ररथाला हिरवी झेंडी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती-** हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादूर यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त देशभर विविध प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. नागपूर येथे ७ डिसेंबर २०२५ रोजी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या उपस्थितीत कार्यक्रम होणार आहे. या कार्यक्रमाच्या प्रचारासाठी चित्ररथाचे जिल्ह्यात आगमन



झाले. या चित्ररथाला जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी हिरवी झेंडी दाखविली. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, नानकराम अहुजा, ड. वासुदेव नवलानी, अमरज्योतसिंग जग्गी, रविंद्रसिंग सलुजा, डॉ. निख्खू खालसा, राजेंद्रसिंग सलुजा, राज छाबडा, दिनेश सचदेव, राजू मोंगा, सरनपालसिंग अरोरा, हरबक्श उपवेजा, सजिंदरसिंग उपवेजा, कुलदेवसिंग अरोरा, भजनसिंग सुलजा, विक्की अरोरा यांच्यासह विविध समाजाचे प्रतिनिधी उपस्थित होते. आज सकाळी हिंद दी चादर श्री गुरु तेग बहादुर साहिबजी यांच्या ३५०व्या शहिदी समागमानिमित्त डिजिटल चित्ररथाचे उत्साहपूर्ण वातावरणात जिल्ह्यात आगमन झाले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात चित्ररथाचे आगमन झाल्यानंतर मान्यवरांची यावरील चित्रफितीची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर आणि मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी या चित्ररथाला हिरवी झेंदी दाखविली. हा चित्ररथ जिल्हाभरात फिरून नागपूर येथील कार्यक्रमाबाबत जनजागृती करणार आहे.

## मुरूम घेवून येणाऱ्या टिप्परच्या धडकेत छायाचित्रकार तरुणाचा जागेवरच मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८शिरजगाव कसबा-** रस्त्याच्या काँक्रिटीकरणाचे काम सुरू आहे. या कामावर मुरूम घेवून येणाऱ्या एका टिप्परने दुचाकीला धडक दिली. या धडकेत दुचाकीस्वार ४२ वर्षीय छायाचित्रकाराचा घटनास्थळीच मृत्यू झाला. हा अपघात गुरूवारी (दि. २७) दुपारी दोन वाजताच्या सुमारास ब्राह्मणवाडा थडी ते घाटलाडकी मार्गावरील टी पॉइंटवर झाला आहे. या घटनेने ब्राम्हणवाडा थडी गावात हळहळ व्यक्त होत आहे.



अमोल दादारावजी पेठे (४२, रा. ब्राह्मणवाडा थडी, ता. चांदूर बाजार) असे मृतकाचे नाव आहे. अमोल पेठे हे गावात एका बँकेचे दैनंदिन रोख गोळा करणे तसेच छायाचित्रणाचा व्यवसाय करत होते. अमोल पेठे हे दुचाकीने जात असताना त्यांना टिप्परने धडक दिली. या धडकेत त्यांचा मृत्यू झाला. मागील काही दिवसांपासून खरपी, शिरजगाव, ब्राह्मणवाडा मार्गे चांदूरबाजार या राज्य महामार्गाचे सिमेंट काँक्रिट बांधकाम सुरू आहे. टिप्परने दुचाकीला धडक दिली. यामध्ये त्यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. नागरिक घटनास्थळी अपघातानंतर घटनास्थळावर ब्राह्मणवाडा थडी येथील संतप्त नागरिकांनी घटनास्थळी जावून वाहतूक रोखून धरली. धडक देणाऱ्या टिप्परचालक व रस्ता बांधकाम करणाऱ्या कंत्राटदार कंपनीवर कारवाई करेस्तोवर मृतदेह उचलणार नाही, अशी मागणी लावून धरली होती.

# रुक्मिणी मातेचे जन्मस्थान कौंडण्यपूर, वारीची विशेष ओळख

## वर्धा नदीकाठी पितृकार्य आणि रक्षा विसर्जनालाही महत्त्व

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८कौंडण्यपूर-**

अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यात असलेले कौंडण्यपूर हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र आहे. रुक्मिणी मातेचे जन्मस्थान, भगवान श्रीकृष्णाचे सासर, पंच सतीचे माहेर आणि विदर्भाची पंढरी म्हणून याची ओळख आहे. अमरावती आणि वर्धा जिल्ह्याच्या सीमेवर, वर्धा नदीच्या तीरावर हे गाव वसलेले आहे.

या तीर्थक्षेत्रातून दरवर्षी पंढरपूरसाठी पायी वारी निघते. १५९४ पासून सुरू असलेली ही परंपरा ३३ दिवसांची असते. या वारीमध्ये माता रुक्मिणीची पालखी आवर्जून समाविष्ट केली जाते, जी विदर्भातील प्रमुख दिंडींपैकी एक आहे. हीच कौंडण्यपूरच्या महात्म्याची विशेष ओळख आहे.

येथे ताम्रपाषाण युगातील वसाहतीचेही काही पुरावे मिळाले आहेत. तसेच, कौंडण्यपूर हे नव्याने तयार होणाऱ्या शक्तिपीठ महामार्गाला जोडण्यात येणार आहे, ज्यामुळे भाविकांना अधिक सुविधा मिळतील. येथे रुक्मिणी मातेचे एक महाभारतकालीन प्राचीन मंदिरही आहे.

वर्धा नदीच्या तीरावर दशक्रिया विधी करण्याचे धार्मिक आणि पौराणिक महत्त्व आहे. अमरावती, वर्धा आणि अकोला जिल्ह्यातून अनेक जण येथे दशक्रिया विधीसाठी येतात. दशक्रिया विधी पूर्ण झाल्यावर कच्चा चिवडा खाण्याचीही येथे परंपरा आहे.

स्थानिक पुजारी राहुल वाठोडकर यांच्या मते, कौंडण्य ऋषींच्या नामस्मरणाने आणि येथील आध्यात्मिक वातावरणात केले जाणारे



पितृकार्य फलदायी मानले जाते. वर्धा नदीसह वारणा आणि पायानी या नद्यांचाही येथे संगम होत असल्याने पितृक्रम करण्याची परंपरा फार पूर्वीपासून रूढ आहे.

कार्तिक महिन्याच्या समाप्ती सोहळ्यानिमित्त येथे रुक्मिणी उत्सव नावाने यात्रा भरते. येथील विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरात ही यात्रा भरवली जाते, जी अमरावती जिल्ह्यातील विविध यात्रोत्सवांमधील पहिली असते. एका व्यावसायिकाच्या माहितीनुसार, येथे सुमारे पंचवीस दुकानांमधून दररोज काही हजार रुपयांचा कच्चा चिवडा विकला जातो.

या परिसराचा धार्मिक, सांस्कृतिक, कृषी आणि औद्योगिक दृष्टीने विकास व्हावा, यासाठी धार्मिक कॉरिडोर तयार केला जात आहे. भाजपचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष आणि रुक्मिणी-अंबा महोत्सवाचे आयोजक रविराज देशमुख यांनी ही माहिती दिली. त्यासाठी रितसर आराखडा तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपवण्यात आल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

# चांदूर रेल्वेत आम आदमी पार्टीच्या युवती उमेदवाराला शिवीगाळ करत छेडछाड

## निवडणुकीत कशाला उभी राहिली, ताबडतोब निवडणुकीतून माघार घे, अन्यथा जीवाने मारण्याची धमकी : चांदूर रेल्वे पोलिसांत आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल, आरोपी अटकेत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८चांदूर रेल्वे**




सध्या चांदूर रेल्वे नगरपरिषद निवडणुकीची रणधुमाळी सुरू असून निवडणूक जसजशी जवळ येत आहेत तसतसे वातावरण थंडीतही तापू लागले आहे. अशातच चांदुर रेल्वे शहरातील एका प्रभागात आम आदमी पक्षाकडून नगरसेवक पदाकरिता निवडणुकीच्या रिंगणात असलेल्या २२ वर्षीय युवती उमेदवाराला एकाने घरात घुसून शिवीगाळ करत छेडछाड केली. निवडणुकीत कशाला उभी राहिली ?, ताबडतोब निवडणुकीतून माघार घे, अन्यथा जीवाने मारण्याची धमकी सुध्दा दिल्याची घटना २७ नोव्हेंबरला रात्री ८.३० ते ८.४० वाजताच्या दरम्यान घडली. याप्रकरणी चांदूर रेल्वे पोलिसांनी एका आरोपीविरुद्ध रात्री ११.४५ वाजता गुन्हा दाखल केला आहे. रवि रामचंद्र कातोरे, रा. चांदूर रेल्वे असे आरोपीचे नाव आहे. आरोपीला पोलीसांनी अटक केली आहे.

प्राप्तमाहितीनुसार, तक्रारकर्ती युवती ही चांदूर रेल्वे नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये आम आदमी पार्टी तर्फे नगरसेवक पदाची निवडणूक लढवीत आहे. सदर युवती निवडणुकीमध्ये उभी झाल्यापासून तिला आरोपीतर्फे वेगवेगळ्या धमक्या येत होत्या, परंतु तिने त्यावर जास्त लक्ष दिले नाही. अशातच २७ नोव्हेंबर रोजी निवडणुकीच्या प्रचाराकरिता ती सकाळपासून घरून निघाली होती व रात्री पक्षाची शेवटची प्रचार सभा टांगा गल्ली येथे संपल्यानंतर ती तिच्या राहते घरी गेली. त्यावेळी तिचे आई, वडील व बहीण हे एका कार्यक्रमांमध्ये गेले होते व त्यांनी घराची किल्ली ठेवली होती. त्या किल्लीने सदर युवतीने घराचे दार उघडून आतमध्ये केली असता अचानक आरोपी हा तिच्या मागून आला व त्याने अचानक तिचा डावा हात वाईट उद्देशाने पकडला. त्यामुळे सदर युवती अचानक घाबरली व तिने हात झटकला. त्यावेळी आरोपीने तिला शिवीगाळ करत म्हटले की, तू इलेक्शन मध्ये उभी कशाला राहिली, ताबडतोब निवडणुकी मधून माघार घे, अन्यथा तुला मारून टाकेल असे म्हणून जीवाने मारण्याची धमकी दिली. तसेच घाणेरड्या भाषेत शिवीगाळ सुद्धा केली. सदर युवती ही खूप घाबरली होती व तिने आरडाओरड केला असता आरोपी हा तेथून पळून गेला. यानंतर तिने घटनेनंतर लगेच चांदुर रेल्वे पोलीस स्टेशन गाठून याबाबतची लेखी तक्रार दिली सदर तक्रारीवरून चांदूर रेल्वे पोलिसांनी आरोपी रवी रामचंद्र कातोरे याच्या विरुद्ध बीएनएस कलम ७४, ३३३, २९६, ३५१ (३) अन्वये गुन्हा दाखल केला असून या प्रकरणाचा पुढील तपास चांदूर रेल्वे पोलीस करीत आहे.

**विरोधकांनी आमच्या उमेदवारांना त्रास देऊ नये – नितीन गवळी**

निवडणुकीची प्रक्रिया सुरू झाल्यापासून आमच्या आम आदमी पक्षाच्या अनेक उमेदवारांना विरोधकांकडून त्रास देणे सुरू आहे. लहानसहान बाबींकडे दुर्लक्ष करीत आम्ही निवडणुकीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करीत आहो. मात्र २७ नोव्हेंबर रोजी घडलेली सदर घटना ही अतिशय दुर्दैवी आहे. याशिवाय आणखी एका प्रभागातील पुरुष उमेदवाराला विरोधकांकडून मारण्याच्या धमक्या मिळत आहे. त्यामुळे विरोधकांनी सदर निवडणूक मैत्रीपूर्ण वातावरणात लढवावी. आम्ही शांततेच्या मार्गाने निवडणूक लढवीत असून कुठल्याही पक्षाला किंवा त्यांच्या उमेदवाराला त्रास दिलेला नाही. त्यामुळे आमच्याही उमेदवारांना कुणीही त्रास देऊ नये अशी प्रतिक्रिया आम आदमी पक्षाचे नेते नितीन गवळी यांनी दिली.

**महिला उमेदवाराला धमकावणे म्हणजे लोकशाहीला थेट आव्हान**

संपूर्ण शहरात ही घटना चर्चेचा विषय ठरली आहे. निवडणूक जवळ येत असतांना महिलेला अशा पद्धतीने धमकावणे हा राजकीय दडपशाहीचा अत्यंत निंदनीय आणि भ्याड प्रकार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहे.

**पुरुषांच्या विरुद्ध एकमेव महिला उमेदवार**

सदर पीडित युवती ज्या प्रभागातील गटातून निवडणूक लढवीत आहे त्या गटात ही एकमेव महिला उमेदवार असून तिच्याविरुद्ध तीन इतर पक्षाचे पुरुष उमेदवार रिंगणात आहे. त्यामुळे सदर जागेच्या निवडणुकीकडे अनेकांचे लक्ष लागलेले.

# बोगस जन्म व मृत्यू प्रमाणपत्र प्रकरण ९६२ जणांविरोधात पोलिसांत तक्रार




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

बोगस कागदपत्रांच्या आधारावार ९४२ जन्म व २० मृत्यू दाखले घेणार्यांच्याविरोधात अमरावती तहसीलदारांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे, अशी माहिती भाजपाचे नेते माजी खासदार किरीट सोमय्या यांनी दिली. यापूर्वी कोतवाली पोलिस ठाण्यात ५३४ जणांवर गुन्हे दाखल करण्यात आले आहे. आमच्या सततच्या पाठपुराव्याचे हे यश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

उपरोक्त प्रकरणचा आढावा घेण्यासाठी किरीटी सोमय्या शुक्रवारी सायंकाळी पुन्हा अमरावतीत आले होते. त्यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, ज्यांनी दाखल्यांसाठी अर्ज दिले, त्यांनी पुरावा म्हणून फक्त आधार कार्ड दिले आहे. त्यांच्या अर्ज आणि शपथपत्रांच्या तारखांमध्ये तफावत आढळून आलेली नाही. प्रमाणपत्र देताना प्रशासकीय अधिकार्यांनी काळजी घेतली नाही, हे जिल्हाधिकार्यांनी सुद्धा मान्य केले आहे. विशेष म्हणजे, ज्यांचे प्रमाणपत्र रद्द झाले आहे, त्यांनी या निर्णयाला न्यायालयात आव्हान दिलेले नाही. याचाच अर्थ त्यांच्याकडे सक्षम कागदपत्रे नाही.

ज्यांच्याकडे आवश्यक सर्व कागदपत्रे आहे, अशाही काही व्यक्तींचे प्रमाणपत्र रद्द झाले असेल तर त्यांना अर्ज करून ते पुन्हा मिळविता येणार आहे. पण, ज्यांनी बोगस कारभार केला आहे, त्यांच्यावर कारवाई होणारच आहे. ज्यांना वाटते ते बांगलादेशी नाही तर त्यांनी भारतीय असल्याचे सिद्ध करावे. काँग्रेस खासदार व काही नेत्यांनी सुरू असलेल्या कारवाईवर आक्षेप घेतला होता, त्यांनी आता नव्याने समोर आलेल्या बोगस प्रमाणपत्रावर आपली भूमिका स्पष्ट करावी. अन्यथा त्यांची मुळ कागदपत्रे सादर करावी, असे आव्हान किरीट सोमय्या यांनी दिले. पत्रकार परिषदेला भाजपाचे शहराध्यक्ष डॉ. नितीन धांडे, किरण पातुरकर, सुधा तिवारी, बादल कुळकर्णी, विक्की शर्मा, श्याम पाध्ये, राजेंद्र मेटे, प्रवीण वैश्य, शैलेंद्र मिश्रा, विवेक चुटके यांच्यासह अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

**तहसीलदाराची विभागीय चौकशी करा**

प्रमाणपत्रे देण्यात अनियमितता झाल्याचे जिल्हाधिकार्यांनी मान्य केले आहे. ज्या तहसीलदारांनी हे प्रमाणपत्र दिले आहे, त्यांची विभागीय चौकशी करण्याची मागणी मी राज्य शासनाकडे केली आहे. मालेगावात अशी चौकशी सुरू झाली असून काहींवर गुन्हे देखील दाखल झाले आहे. अमरावतीत चौकशी होईल, हा विश्वास असल्याचे किरीट सोमय्या यांनी सांगितले.

# जुळ्या शहराच्या विकासासाठी भाजपाला मते द्या - पालकमंत्री बावनकुळे

## परतवाड्यात जाहीर प्रचारसभा




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८परतवाडा**

दोन तारखेची निवडणूक ही शहराच्या विकासाची निवडणूक आहे. ही निवडणूक महत्त्वाची असून चुकीच्या उमेदवाराला दिलेल मत तुम्हाला मिळणार्या शासकीय योजनांचा बट्ट्याबोळ केल्याशिवाय राहणार नाही. शहराचा, परिसराचा विकास खुंटल्या जाऊ शकतो, म्हणून भाजपालाच मते द्या, असे आवाहन पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी परतवाडा येथे आयोजित प्रचारसभेत केले. अचलपूरच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रूपाली माथने, चांदूर बाजारच्या कांताबाई अहीर, अंजनगावचे अविनाश गायगोले, दर्यापूरच्या उमेदवार नलिनी भारसाकळे यांच्या प्रचारार्थ ते बोलत होते.

पालकमंत्री पुढे म्हणाले की, शहरातील १५ ऑक्टोबर २०२४ पूर्वी जी घरे नझूलच्या जागेत बांधली गेली त्या सर्वांना प्रॉपर्टी कार्ड सरकार देणार आहे. शहराच्या सुरक्षेसाठी ठिकठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे लावू. केंद्राच्या व राज्याच्या १२४ योजना नगरपालिकांद्वारे राबविल्या जातात, त्या योजनांचा लाभ घेण्याकरिता शहरात भाजपची सत्ता आणा, असे आवाहन त्यांनी केले. राज्यातील भाजप सरकारने शेतकर्यांचे २७०० कोटी रुपयांचे वीज बिल माफ केले. शेतीला मोफत वीज दिली. कर्जमाफी देखील जाहीर केली, त्यामुळे हे सरकार शेतकरी हिताचे निर्णाय घेणारे सरकार आहे, असे बावनकुळे म्हणाले.

यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे, आ. प्रवीण तायडे, माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष दिनेश सूर्यवंशी व उपस्थित अनेक नेत्यांची भाषणे झाली. मंचावर आमदार केवलराम काळे, माजी आमदार प्रभुदास भिलावेकर, रमेश बुंदेले, निवडणूक प्रभारी विनोद वाघ , भाजप पदाधिकारी जयंत डेहणकर, गजानन कोल्हे, जिल्हा सरचिटणीस सुधीर रसे, प्रमोद कोरडे, तुषार खेरडे, मंडल अध्यक्ष कुंदन यादव, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रुपाली अभय माथने, कांताबाई अहीर, नलिनी भाळसाकळे, अविनाश गायगोले यांच्यासह ३८ उमेदवार व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दर्यापुरात निवडणुकीसाठी पाच क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८दर्यापूर**

होऊ घातलेल्या नगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी पाच क्षेत्रीय अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच जिल्हापरिषद बांधकाम विभाग व आदी प्रशासकीय विभागातील उपविभागीय अभियंत्यांचा क्षेत्रीय अधिकारी म्हणून निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब दराडे यांनी नियुत्क्या केल्या आहेत.

नगरपालिकेचा सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रशासनाच्यावतीने युद्धपातळीवर तयारी करण्यात येत असून, मतदानासाठी क्षेत्रीय अधिकाऱ्यांचा नियुत्क्या करण्यात आल्या आहेत. नगरपालिकेच्या १२ प्रभागासाठी ५ झोन करण्यात आले आहे. या पाच झोनसाठी अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष मतदान केंद्रांची जबाबदारी असणार आहे, तर अतिरिक्त दोन क्षेत्रीय अधिकारी राखीव असणार आहेत. दरम्यान या नियुक्त कनिष्ठ पाच क्षेत्रीय अभियंत्यांच्या निवडीमुळे प्रभागातील हालचालींवर लक्ष ठेवण्यास मदत होणार आहे. शिवाय अधिकाऱ्यांकडे प्रत्यक्ष मतदान केंद्रांवरील जबाबदारी देण्यात आली आहे. यामुळे मतदान केंद्रांवरील नियंत्रण ठेवण्यास त्याचे लक्ष राहणार आहे. ही सर्व निवडणूक प्रक्रिया निवडणूक निर्णय अधिकारी दादासाहेब दराडे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विकास खंडारे, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. रवीद्रकुमार कानडजे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत आहे.

**क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिली जबाबदारी**

उपविभागीय अभियंता रवींद्र शेगोकार यांच्याकडे प्रभाग क्र. १,२,३, उपविभागीय अभियंता रोहित बादगुडे यांच्याकडे ४,५,६ उपविभागीय अभियंता पंकज घाडगे यांच्याकडे ७ व १०, तर उपविभागीय अभियंता सुनील पैठणकर यांच्याकडे ८. ९ तर सहा. निबंधक किशोर बलिंगे यांच्याकडे ११,१२ तर कनिष्ठ अभियंता पी. ए. तंबाखे व दर्शन खंदारकर हे दोनजण राखीव आहेत.

**आचारसंहितेचे पालन करावे**

निवडणूक आयोगाने आदर्श आचारसंहितेची नियमावली जाहीर केली असून नगरपरिषद सार्वत्रिक निवडणूक दरम्यान, सर्व उमेदवारांसह आदर्श लोकप्रतिनिधीनीही आचारसंहितेचे पालन करण्याबाबत जिल्हा प्रशासनाकडून सांगण्यात आले. प्रचार सभा, बॅनर लावण्याबाबत पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे. आचारसंहितेचे उल्लंघन करताना आढळून आल्यास निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार कडक कारवाई केली जाईल, असा इशाराही प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# ऋषिकेशची हत्या करणाऱ्यांची धिंड काढा

## रवी राणांची पोलिसांकडे मागणी –खोपकर कुटुंबीयांना १ लाखांची मदत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८बडनेरा**

ऋषिकेश खोपकरची हत्या करणार्यांची शहरातून धिंड काढा, अशी संतापयुक्त मागणी आ. रवी राणा यांनी पोलिस आयुक्तांकडे केली असून ऋषिकेशच्या कुटुंबीयांना एक लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे.

बडनेरा शहरात सर्वसामान्य जनतेमध्ये प्रचंड धाक निर्माण करणारी घटना सावता मैदान परिसरात घडली. मंगळवारी रात्री १२.३० च्या सुमारास वस्तीमध्ये घुसून घरातून बाहेर काढून दहा ते बारा जणांनी ऋषिकेश खापेकर ह्या २७ वर्षीय तरुणाची निर्घृण हत्या केली आणि कोणी पोलिसांना कळवले तर तुम्हाला सुद्धा जीवे मारू अशी धमकी त्यांच्या घरच्यांना व शेजार्यांना दिली. सदर घटनेने प्रचंड संताप नागरिकांमध्ये असून आमदार रवी राणा यांनी मृतक ऋषिकेशच्या कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली. ऋषिकेश हा अतिशय गरीब परिवारातून असून कुटुंबियांचा कर्ता असून आधार होता. त्यांच्या मागे त्याची सासू, पत्नी आणि फक्त १२ दिवसाची मुलगी होती. विशेष म्हणजे त्या लहान बाळाचा नामकरण विधी सोहळा येत्या ३ दिवसात होणार होता.संपूर्ण परिवार आणि ऋषिकेश ह्याच आनंदात असतांना अचानक घडलेल्या ह्या दुर्दैवी घटनेने प्रचंड दुःख ह्या परिवाराच्या वाट्याला आल्याचे आमदार रवी राणा यांनी जाणून घेतले आणि पोलिस निरीक्षक सुनील चव्हाण ह्यांना चांगलेच फैलावर घेतले. सोबतच पोलिस आयुक्त अरविंद चावरिया यांना कॉल करून आरोपींची भर वस्तीत धिंड काढून धुलाई करा आणि बडनेराची स्थिती सुधारा, गुन्हेगारांना वठणीवर आणा अशी मागणी केली. सोबतच ऋषिकेशच्या परिवाराला वैयक्तिकरीत्या १ लाख रोख मदत करण्याचे जाहीर केले. यावेळी आमदार रवी राणा यांच्या सोबत भाजपा सरचिटणीस गौरव बांते, युवा स्वाभिमाचे शहर अध्यक्ष अजय जयस्वाल, किरण अंबाडकर, समीक्षा गोटेफोडे, ज्योत्स्ना अंबाडकर, संदीप इंगोले, बजरंग दलचे प्रमुख श्रीरंग बडनेरकर, सतीश साबळे, उमेश बेदूरकर, आदित्य कावरे, जगदीश कडव आणि परिसरातील शेकडो नागरिक उपस्थितत होते.

# महाराष्ट्रात कडधान्य क्रांतीची सुरुवात : केंद्राचे आत्मनिर्भरता अभियान राबवण्यासाठी फडणवीस सरकारची मंजुरी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८मुंबई**

महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी मोठा दिलासादायक निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. केंद्र सरकारने जाहीर केलेल्या कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राज्यात राबवण्यासाठी फडणवीस सरकारने अधिकृत मंजुरी दिली आहे. पुढील पाच वर्षे हे अभियान राबविले जाणार असून, महाराष्ट्राला कडधान्य उत्पादनात आत्मनिर्भर करण्याचा हा मोठा प्रयत्न आहे. शेतकऱ्यांना कडधान्याचे उत्पादन वाढवता यावे, आयातीवरील अवलंबित्व कमी व्हावे आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना मिळावी हा या उपक्रमामागचा उद्देश. या अभियानामुळे राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि महिला शेतकऱ्यांना थेट लाभ मिळणार आहे.

या योजनेअंतर्गत बियाणे उत्पादन आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या बियाणांच्या खरेदीसाठी १०० टक्के मदत केंद्र सरकार करणार आहे. तर इतर शेतीविषयक उपाययोजनांसाठी केंद्र ६० टक्के आणि राज्य ४० टक्के निधी देणार आहे. विशेष म्हणजे अभियानाची अंमलबजावणी काटेकोरपणे करण्यासाठी राज्य शासनाने प्रशासनाला स्पष्ट सूचना दिल्या आहेत. या निधीचे वितरण आणि योजनेचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी कृषी विभागाकडे देण्यात आली आहे.



केंद्राने २०२५-२६ ते २०३०-३१ या कालावधीसाठी देशभर हा महत्त्वाकांक्षी उपक्रम राबवण्याचा निर्णय घेतला असून, यासाठी एकूण ११,४४० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील ३४ जिल्ह्यांची निवड या योजनेसाठी झाली असून, तूर, हरभरा, उडीद, मूग आदी कडधान्यांच्या उत्पादन क्षेत्रात वाढ करण्याचा उद्देश आहे. शेतकऱ्यांना योग्य बियाणे, मार्गदर्शन, तंत्रज्ञान आणि बाजारपेठ यांचा लाभ मिळावा यासाठी विविध योजना यामधून राबवल्या जाणार आहेत.

**महिला शेतकरी आणि समाजातील मागास घटकांना प्राधान्य**

केंद्र शासनाने राज्याला दिलेल्या मार्गदर्शक सुचनांनुसार महिला शेतकरी आणि समाजातील मागास घटकांना प्राधान्य दिले जाणार आहे. कडधान्य उत्पादनात हे घटक मोठ्या प्रमाणात सहभागी असतात, त्यामुळे त्यांना तांत्रिक प्रशिक्षणे, प्रोत्साहन आणि आर्थिक सहाय्य मिळाल्यास कुटुंबाची आर्थिक प्रगती अधिक वेगाने होईल, असा सरकारचा विश्वास आहे. तसेच, जिल्हानिहाय कृती आराखडा तयार करून अभियानाचे नियमित निरीक्षण केले जाईल.

# ‘होम वोटिंग’ची सुविधा नसल्याने वृद्ध, दिव्यांगांमध्ये आहे नाराजी

## लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये होती ’होम वोटिंग’ची सुविधा

अरुण जोशी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८ अमरावती**

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांमध्ये दिव्यांग, गंभीर आजारी तसेच वृद्ध मतदारांसाठी अत्यंत महत्त्वाची ठरलेली ’होम वोटिंग’ सुविधा यावेळी नगरपरिषद निवडणूक २०२५ मध्ये उपलब्ध नसल्याने अनेक मतदारांमधून नाराजी व्यक्त होत आहे. निवडणूक आयोगाकडून यासंदर्भात कोणतीही अधिकृत अधिसूचना स्थानिक निवडणूक अधिकाऱ्यांना देण्यात आलेली नसल्याची माहिती मिळाली आहे.

लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांत घरून मतदानाची मुभा देत असताना, याच पद्धतीने नगर परिषद निवडणुकीतही सर्वसमावेशक मतदान व्हावे, अशी नागरिकांची अपेक्षा होती. मात्र, या निवडणुकीत ’होम वोटिंग’ची सुविधा न दिल्याने वृद्ध, दिव्यांग, आजारी मतदार मतदान प्रक्रियेतून वंचित राहण्याची शक्यता वाढली आहे. मतदान करणे आपला हक्क, चला मतदान करू या, अशा संदेशांचे मोठमोठे बॅनर लावून जागरूकता मोहीम




राबवली जाते. मात्र, ज्या मतदारांना प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येणे शक्य नाही, त्यांच्यासाठी कोणतीही विशेष सुविधा न दिल्याने हे बॅनर व संदेश केवल औपचारिक ठरल्याची खंत नागरिक व्यक्त करत आहेत.

**यासाठी होती योजना**

होम वोटिंग’चा मूलभूत उद्देश समाजातील सर्वात अशक्त आणि चालण्यास असमर्थ असलेल्या मतदारांसाठी तयार करण्यात आला आहे. या योजनेचे उद्दिष्ट अत्यंत स्पष्ट आहे. शारीरिक अडचणींमुळे मतदान केंद्रापर्यंत पोहोचू न शकणाऱ्या नागरिकांना घरबसल्या मतदानाचा हक्क देता यावा. वयोवृद्ध, दिव्यांग, गंभीर आजारी किंवा शय्याग्रस्त मतदारांसाठी ही सुविधा मोठा दिलासा देणारी ठरते. प्रत्येक मतदाराने मतदानाच्या पवित्र प्रक्रियेत सहभागी व्हावे, यासाठी ही योजना महत्त्वाची आहे.

**दुर्धर आजाराने ग्रस्त मतदार मतदानापासून राहणार वंचित**

वयोवृद्ध, ४०-१०० टक्के दिव्यांग, हृदय किंवा कॅन्सरसारख्या गंभीर आजारांनी ग्रस्त नागरिकांना मतदानाच्या दिवशी घरीच राहावे लागणार आहे. अनेकांनी प्रशासनाकडे ’होम वोटिंगबाबत चौकशी केली असता, अशी कोणतीही व्यवस्था नसल्याचे उत्तर मिळाले. यामुळे मताधिकारापासून दिव्यांग बांधव वंचित राहण्याची शक्यता आहे.

**सामाजिक संघटनांची मागणी**

शहरातील सामाजिक संस्था आणि नागरिकांनी निवडणूक आयोगास नगर परिषद स्तरावरही होम योटिंग तातडीने लागू कराये, अशी मागणी केली आहे. लोकशाही मजबूत करण्यासाठी प्रत्येक मतदाराचा सहभाग आवश्यक असताना, सुविधेअभावी मतदारांना मतदानापासून दूर ठेवणे योग्य नसल्याचे मत नागरिक व्यक्त करीत आहेत.

# गुप्त बैठकांमधून प्रतिस्पर्धकांचा होणार ‘सायलेंट गेम’

## प्रचाराचा वेग वाढू वाढला : वातावरण तापू लागले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८धा.रेल्वे**

निवडणुकीचा दिवस जसजसा जवळ येत आहे तसतसा प्रचाराला वेग येत असून, निवडणुकीचे वातावरण दिवसेंदिवस तापतच चालले आहे. प्रचाराची मुदत जवळ आल्यामुळे, उमेदवार आता थेट मतदारांच्या दारी पोहोचून मतांचा जोगवा मागत फिरत आहेत. या थेट भेटीदरम्यान उमेदवारांना केवळ आपल्या योजनाच नव्हे, तर नागरिकांचे मूलभूत गाऱ्हाणे आणि स्थानिक समस्या देखील ऐकाव्या लागत आहेत. समस्या त्वरित सोडवण्याचे आश्वासन देऊन उमेदवार मतदारांचे मन वळवण्याचा प्रयत्न करत आहेत. स्थानिक कार्यकर्तेही उत्साहाने या प्रचारात सहभागी असल्याने वातावरण ढवळून निघाले आहे. विशेष म्हणजे, राजकीय पक्षांचे उमेदवार चिन्हाला घेऊन प्रचाराला लागले असतानाच अपक्षांची मात्र चांगलीच फसगत होत आहे; मात्र तरीही ते जोमात प्रचार करीत असून निवडणूक चिन्हाऐवजी आपल्या ओळखीतर त्यांनी मतदारांपर्यंत पोहोचण्यास सुरुवात केली आहे.



**पडद्याआड रणनीतीचा कस**

उमेदवारांकडून जाहीर सभांऐवजी पडद्यामागील गुप्त रणनीती’वर अधिक लक्ष केंद्रित केले आहे. निर्णायक मतांची जुळवाजुळव करण्यासाठी ’सायलेंट गेम’ खेळले जात आहेत. प्रभागातील प्रभावशाली व्यक्ती आणि महत्त्वाच्या कार्यकर्त्यांच्या गुप्त बैठका घेऊन मतांवर प्रभाव टाकण्याचे अंतिम प्रयत्न सुरू आहेत.

**गठ्ठा मतांसाठी विशेष ’प्लान’**

विशिष्ट समाज गट किंवा भागातील ’गठ्ठा’ मते आपल्या बाजूने वळविण्यासाठी विशेष डावपेच आणि योजना आखल्या जात आहेत.

**परित देऊन बरांचे मन**

**प्रयत्न हेत**


निवडणुकीच्या सुरुवातीला नाराज झालेल्या स्थानिक कार्यकर्त्यांना समजावून पुन्हा सक्रिय करण्यासाठी युद्धपातळीवर काम सुरू आहे. कामासाठी बाहेर असलेल्या मतदारांना मतदानासाठी आणण्याकरिता संपर्क साधून विशेष विनंती केली जात आहे.

**कमी दिवसांत अनेक कामे**

नगरपरिषद निवडणुकीचा हा मुकाबला शेवटच्या क्षणापर्यंत उत्सुकता वाढवणारा आणि अतिशय चुरशीचा ठरणार आहे. अगदी कमी दिवसांत अनेक कामे (बैठका, संपर्क आणि मनधरणी) पार पाडण्याची कसरत उमेदवारांना करावी लागत आहे.

# आता मुंबई गाठण्याची गरज नाही, जिल्ह्यातच सीईटीच्या तक्रारी सुटणार

## विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा, अनावश्यक प्रवास टळणार : प्रत्येक जिल्ह्यात होणार सुसज्ज हेल्प सेंटर : राज्यात ७३ अभ्यासक्रमांची होते सीईटी परीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

सीईटी परीक्षा, निकाल, दस्तऐवज पडताळणी किंवा प्रवेशासंबंधी तक्रार असल्यास विद्यार्थ्यांना थेट मुंबईतील सीईटी कक्षाशी संपर्क साधावा लागत होता. विशेषतः ग्रामीण व दुर्गम भागातील विद्यार्थ्यांसाठी हा प्रवास त्रासदायक आणि खर्चिक ठरत होता.

वेळ, पैसा आणि प्रयत्न वाया जात होते. परंतु, आता शासन राज्यभरात स्वतःची ४० जिल्हास्तरीय सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष मदत केंद्रे स्थापणार आहे. यामुळे विद्यार्थ्यांना जिल्ह्यातच सर्व मार्गदर्शन, अर्ज प्रक्रियेतील साहाय्य आणि वेळोवेळी निर्माण होणाऱ्या तक्रारींवर तत्काळ निवारण मिळणार आहे. विद्यार्थ्यांची गैरसोय टळून मुंबईवारी आता संपणार आहे.मदत केंद्रातून विद्यार्थ्यांना अर्ज करण्यापासून ते निकाल तपासणीपर्यंत आवश्यक मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाणार आहे.महाराष्ट्रात अभियांत्रिकी, फार्मसी,एमबीए, विधी आणि इतर ७३ अभ्यासक्रमांसाठी सीईटी परीक्षा घेतल्या जातात. या परीक्षांसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाकडून १९ वेगवेगळ्या परीक्षा घेतल्या जातात.यापूर्वी सीईटी परीक्षा, निकाल, प्रवेश प्रक्रिया किंवा पडताळणीदरम्यान उद्भवलेल्या सीईटीशी संबंधित तक्रारी, अर्ज प्रक्रियेतील गोंधळ, तसेच दस्तऐवज पडताळणीसाठी विद्यार्थ्यांना थेट मुंबईत जाऊन सीईटी कक्षाशी संपर्क साधावा लागत होता. आता यासाठी जिल्हास्तरावर मदत उपलब्ध होणार आहे.

**जिल्ह्यात पूर्णवेळ आणि सुसज्ज केंद्राची स्थापना**

जिल्ह्यात प्रत्येकी एक याप्रमाणे पूर्णवेळ कार्यरत, सुसज्ज मदत केंद्रे स्थापन करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाने घेतला आहे.

**मदत, मार्गदर्शन आणि तक्रारींचा निपटारा**

जिल्हास्तरावरच मदत केंद्रातून सर्वसमावेशक सुविधा पुरवण्याचा निर्णय सीईटीने घेतला आहे. प्रवेश प्रक्रिया, निकाल व सीईटीशी संबंधित तक्रारींबाबत मार्गदर्शन, तसेच तक्रारींचा तातडीने निपटारा केला जाणार आहे.

# बहीरम यात्रेसाठी प्रशासन सज्ज

## ८ डिसेंबर पासून जागा लिलावाला सुरवात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८बहीरम**

सन २०२५-२६ वर्षा करिता पंचायत समिती चांदुर बाजार अंतर्गत श्री क्षेत्र बहिरम यात्रा २० डिसेंबर ते ३० जानेवारी या कालावधीत भरविण्यात येत आहे. बहिरम यात्रेच्या परिसरातील प्लॉट/भुखंडाचा हर्रास व फेरहर्रास ८ डिसेंबर ते १६ डिसेंबर पर्यंत आयोजित करण्यात आला आहे.




श्री क्षेत्र बहिरम हे ठिकाण ग्रामपंचायत कारंजा बहिरम, पंचायत समिती, चांदुर बाजार जिल्हा परिषद या क्षेत्रातयेते. यात्रेचेठिकाणसातपुडा पर्वत रांगेच्या पायथ्याशी बसलेले आहे. बहिरम यात्रेचे ठिकाण हे जिल्हा मुख्यालयापासुन ५७ कि.मी. व चांदुर बाजार या ठिकाणाहुन २७ कि.मी. या अंतरावर आहे. श्री क्षेत्र बहिरम येथे बहिरम बाबा (भैरव) ची पुरातन मुर्तीअसून सदर ग्राम दैवत स्थानिक नागरिकांचे कुलदैवत आहे.बहिरम यात्रा ही पारंपारिक यात्रा असून, यात्रेला अनेक वर्षाचा इतिहास आहे. शेतकऱ्यांचा खरीप हंगाम झाल्यानंतर सुगीच्यादिवसामध्येहियात्रा अनेक वर्षापासुन आयोजित करण्याची परंपरा या यात्रेला लाभलेली आहे. यात्रेमध्ये पुर्वीच्या काळापासून शेतकऱ्यांना आवश्यक असलेल्या शेती उपयोगी साहित्याचे दुकाने असायची, काळानुरुप सदर यात्रेचे स्वरुप बदलत असल्याचे दिसुन येत आहे. यात्रेमध्ये पारंपारिक दुकानाच्या ओळी असुन त्यामध्ये नारळ प्रसाद दुकाने, पितळी चर्मनी भांडे, लोखंडी सामान, मणी, पोत, मणीवरी, कटलरी, हॉटेल्स, सायकल स्टैंड, हलवाई, मिटाई, फुटाणे, खेळणी,चिनी मातीची भांडे, रसवंती, किराणा दुकाने, कापड, होजीयरी, दरी चादर, दगडी सामान, कर्तनालय, तळय, घोंगळ्या, चादरी, रजई, दुलाई, लाकडी सामान, भाजीपाले, सिनेमा, झुले इत्यादी प्रकारच्या दुकान ओळी असून आजतागायत याच पारंपारिक ओळी नुसार यात्रेचे प्लॉट लेआऊट रेखांकन करुन यात्रा आयोजित करण्यात येते.

# चिन्ह मिळताच उमेदवारांची पदयात्रा सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२७ मोर्शी**

नगर परिषदेच्या निवडणुकीसाठी उभे असलेल्या उमेदवारांना बुधवारी चिन्ह वाटप करण्यात आल्यानंतर प्रचाराने चांगलीच गती पकडली आहे.

प्रचारासाठी उमेदवार बॅनर, पोस्टरचा वापर करीत असले तरी बहुतेक उमेदवारांनी पदयात्रांवरच भर दिला आहे. या पदयात्रांच्या माध्यमातून ते ’डोअर टू डोजर’ भेट देत आहेत. या पदयात्रांनी शहरात सध्या गजबज दिसत आहे.निवडणुकीसाठी नगराध्यक्ष पदाचे १० आणि नगरसेठकपदाचे ८२ असे एकूण ९२ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात




आहेत. हे सर्व उमेदवार प्रचारात चांगलेच व्यस्त झाले आहेत. या पदयात्रांमध्ये भाजप आणि काँग्रेसनेच आघाडी घेतली आहे. काही अपक्ष उमेदवारही पदयात्रा काढून प्रचार करीत आहेत. पदयात्रा प्रामुख्याने सकाळी आणि संध्याकाळी चार वाजल्यानंतर काढण्यात येत आहेत. घरोघरी जाऊन नमस्कार करीत आम्हालाच मतदान करण्याचे व एकदा संधी देण्याचे आवाहन केले जात आहे. या पदयात्रांमध्ये विशेषकरून महिलांची उपस्थिती दिसत आहे.

भोंगे ही वाजू लागले......आपले नाव मतदारांपर्यंत पोहोचावे, यासाठी उमेदवारांनी भौग्यांचा वापर सुरू झाला आहे. यासाठी ऑटोवाल्यांना सुगीचे दिवस आले आहेत.

# फ्रीजचा स्फोट होऊन घराला आग; अग्निशामक गाडी विषयी नागरिकात संताप

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अंजनगाव सुर्जी**

येथील सावकार पुऱ्यातील रहिवासी दीपक देवलसी यांच्या घरी फ्रीज चा स्फोट होऊन अचानक घरात आग लागल्याची घटना आज दिनांक. २७ नोव्हे. ला सायंकाळी सात वाजताच्या दरम्यान घडली.याबाबत माहिती अशी की, स्थानिक सावकार पुऱ्यातील दीपक देवलसी घरी असताना त्यांच्या स्वयंपाक घरा मधील फ्रिजचा स्फोट होऊन आगीने पेट घेतला होता.



तातडीने अग्निशामक गाडीला बोलाविण्यात आले होते. परंतु अंजनगाव सुर्जी येथील नगरपरिषद मधील अग्निशामक गाडीचा वेळेवर काहीही उपयोग होऊ शकला नसल्याने नागरिकांनीच धावपळ करून सदर घरातील आग विझवली. सदर आगीमध्ये कोणतीही जीवित हानी झाली नाही. घटनास्थळी आग विझवण्याकरिता आलेली गाडी मध्ये बिघाड असल्याने सदर गाडी घरातील आग विझवण्याकरिता उपयोगी पडली नसल्याने नगरपालिकेच्या अग्निशामक गाडीबद्दल नागरिकांनी संताप व्यक्त केला. नगरपालिकेतील अग्निशामक विभागात भोंगळ कारभार असल्याचे नागरिकांना दिसून आल्याने नागरिकांनी सदर विभागाची कसून चौकशी करण्याची मागणी केली आहे.सदर आग शॉर्टसर्किटमुळे झाल्याचे बोलल्या जात आहे. आगीचे कारण अद्याप स्पष्ट झाले नसून नेमके किती नुकसान झाले समजू शकले नाही.

# अखेर जिप, पंस., अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

## १५ लाख ३५ हजार ८९७ मतदार बजावणार हक्क

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२८अमरावती**

आरक्षणाच्या प्रश्नावर सुप्रीम कोर्टात सुनावणी अंतीम निर्णयावर पोहोचली आहे. शुक्र वार २८ नोव्हेंबरला अंतीम निर्णय येईल. मात्र असे अशताना जिल्हा परिषदेसह १४ पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या पार्श्वभुमिवर आयोगाने मतदार यादी कार्यक्रम वेळापत्रका नुसार सुरु असताना तीनदा मुदतवाढ मिळाल्याने मतदार यादीची अंतिम प्रसिद्धी गत महिनाभरापासून रखडली होती. अखेर गुरुवारला १५ लाख ३५




हजार ८९७ मतदारांचीअंतिम यादी प्रसिद्ध करण्यात आली. जिल्हा परिषद, १४ पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूकीच्या पार्श्वभूमिवर आयोगा कडून मतदार यादी कार्यक्रम ऑक्टोबरमध्येलावण्यात आला. प्रारुप मतदार यादीनंतर यावर आक्षेप स्वीकारून २३ ऑक्टोबर रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार होती. मात्र तांत्रिक अडचणीचे कारण समोर करून याला सुरूवातीला १२ नोव्हेंबर त्यानंतर २४ नोव्हेंबरची मुदतवाढ देण्यात आली होती. त्यानंतर पून्हा आयोगा कडून अंतिम प्रसिद्धीला २७ नोव्हेंबरपर्यंत मुदतवाढ देण्यात आली. अखेर गुरुवारी पंचायत समितीनिहाय मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. मतदार यादीमध्ये ७ लाख ८२ हजार ६९१ पुरूष, ७लाख ५३ हजार १९५ महिला१९५ महिलाव ११ इतर अशी एकूण १५ लाख ३५ हजार ८९७मतदारांची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत